# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

-----------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२२ / पौष ७, १९४४ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

-----------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ७७**

-----------------------------------------

### मुंबई पश्चिम उपनगरातील भगवती रुग्णालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१) * १५२०२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील भगवती रुग्णालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातील सर्व मूलभूत सेवा सुविधा अद्ययावत करण्यासाठी सन २०१० मध्ये भूमिपूजन करुनही सदर योजनेचे काम प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले असून मुंबईतील कांदिवली (प.) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातील बहुतांश विभाग हे कंत्राटी पध्दतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील महत्वाचा असलेला अतिदक्षता विभाग देखील कंत्राटी पध्दतीने सुरु असून कंत्राटदाराला महानगरपालिकेकडून वेळेवर मानधन मिळत नसल्यामुळे विभागातील डॉक्टरांचे अनेक महिन्यांचे वेतन थकीत राहिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयातील डायलेसिस विभागातील तंत्र सामुग्री कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्यात आले असून अद्यापपर्यंत सदर विभागाकरीता निविदा प्रक्रिया राबविण्यात न आल्याने हा विभाग देखील बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रुग्णालयातील एक मोकळा भूखंड हा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरीता राखीव असून याबाबत महानगरपालिकेकडून कोणताही आराखडा तयार करण्यात न आल्याने विभागातील नागरिकांना अतिदुर्गम आजारांवरील उपचारासाठी मुंबईतील कुपर, के.ई.एम. किंवा नायर या रुग्णालयात जावे लागत आहे, तसेच रुग्णांची गैरसोय होत असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १४ जून, २०१९ रोजी निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयातील सर्व मूलभूत सोयी सुविधा योजनेचे रखडलेले काम जलद गतीने सुरु करण्याकरीता महानगरपालिकेकडून भगवती रुग्णालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयाकरीता अधिकचा निधी देऊन रुग्णालयात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बोरिवली (प.) येथील भगवती रुग्णालयाच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील परिचारिका प्रशिक्षण केंद्र बांधण्याचे काम सन २०१५ मध्ये पूर्ण झाले आहे. दुसऱ्या टप्प्यातील ४९० रुग्णशैय्यांच्या सुसज्ज रुग्णालयाच्या मुख्य इमारतीचे बांधकामासाठी कंत्राटदाराला दिनांक ०१/०८/२०१९ रोजी महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आला असून सदर इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

कांदिवली (प.) येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयातील वैद्यकीय व शल्यचिकित्सा अतिदक्षता विभागामध्ये बहिस्त्रोत पध्दतीने केवळ इन्सेन्टिव्हिस्टची सेवा तसेच डायलेसिस सेंटरमध्ये केवळ डायलेसिस टेक्निशियन्सची सेवा प्रतिपूर्ती स्वरुपात कंत्राटी तत्वावर घेण्यात आली आहे.

(२) डॉ.आंबेडकर रुग्णालयातील वैद्यकीय व शल्यचिकित्सा अतिदक्षता विभागामध्ये इन्टेन्सिव्हिस्टची सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराचा करार दिनांक २८/०९/२०२२ रोजी संपुष्टात आला आहे. त्यांना माहे ऑगस्ट २०२२ पर्यंत सर्व महिन्यांच्या देयकांचे नियमानुसार प्रतिपूर्ती अधिदान महानगरपालिकेमार्फत करण्यात आले आहे. माहे सप्टेंबर २०२२ च्या देयकासोबत जोडलेल्या कागदपत्रांची छाननी व अधिदानाबाबत महानगरपालिकेमार्फत प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

तसेच नवीन कंत्राटदाराने माहे ऑक्टोबर २०२२ चे देयक प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकेकडे सादर केले आहे. सदर देयकासह जोडलेल्या कागदपत्रांची छाननी करुन अधिदानाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

कंत्राटदाराने आय.सी.यू. मध्ये सेवा देणाऱ्या डॉक्टरांना वेळेवर मानधन दिले असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) डॉ.आंबेडकर रुग्णालयात सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन प्रकल्पांतर्गत मे. नमिनाथजी जैन फाउंडेशन यांनी सुरु केलेली डायलेसिस केंद्राची सेवा दिनांक १९/१२/२००८ पासून कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांनी बंद केली. सदर संस्थेला, सेवा खंडीत करुन काळ्या यादीत का टाकण्यात येऊ नये यासाठी महानगरपालिकेमार्फत कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली होती. संस्थेने डायलेसिस सेंटर पुन्हा सुरु करण्याकरीता केलेल्या मागण्यांनुसार विविध बाबींची पूर्तता करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत वारंवार मुदतवाढ देवूनही संस्थेने डायलेसिस सेंटर सुरु केले नाही. यास्तव महानगरपालिकेमार्फत पुन्हा कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आली. तद्नंतर त्यांच्या सेवा खंडीत करण्यात आल्या आहेत.

रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता कोविड काळात डॉ.आंबेडकर रुग्णालयात रोटरी क्लबच्या सहकार्याने स्थानिक लाईफलाईन हॉस्पिटल यांचेमार्फत डायलेसिसची सेवा पुरविण्यात आली होती.

सद्य:स्थितीत या रुग्णालयात महानगरपालिकेमार्फत डायलेसिसची सेवा पुरविण्यात येत आहे.

(४) डॉ.आंबेडकर रुग्णालयाच्या आवारातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरीता आरक्षित असलेल्या रिकाम्या भूभागावर ३२५ रुग्णशैय्यांचे सुपर स्पेशालिटी रुग्णालय व इतर इमारतींच्या प्रकल्पाचे काम करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून यशस्वी निविदाकारास महानगरपालिकेमार्फत दिनांक १६/११/२०२२ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सदर ठिकाणी प्रकल्प उभारणीचे काम सुरु आहे.

(५) भगवती रुग्णालयाच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील रुग्णालय मुख्य इमारत व डॉ.आंबेडकर रुग्णालयाच्या आवारात सुपर स्पेशालिटी रुग्णालय प्रकल्पाचे बांधकाम सुरु असून सदर दोन्ही प्रकल्प उभारणीसाठी महानगरपालिकेमार्फत आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नवीन बसेस दाखल करण्याबाबत

**(२) * १५४५८ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात सन २०१६ पासून एकही नवीन गाडी दाखल न झाल्यामुळे सुमारे ६ हजार २८९ राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्या भंगारात जाऊन सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या जुन्या गाड्या जीर्ण व दुरवस्थेत असल्यामुळे सदर गाड्यांमधून नागरिकांना प्रवास करणे गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नवीन बसेस उपलब्ध करुन देण्याची मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात नवीन बस दाखल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.

(३) होय.

(४) व (५) सन २०१६ पासून टप्प्याटप्पाने नवीन वाहने महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा करण्यात आल्या आहेत व नजीकच्या काळात जमा करण्यात येत आहेत. रा.प. महामंडळाने सन २०१६ पासून महामंडळाच्या वाहन ताफ्यात खालीलप्रमाणे वाहने समाविष्ट केली आहेत.

७०० नवीन वाहने महामंडळाच्या वाहन ताफ्यात जमा होण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. तसेच सन २०२२-२३ करीता २००० नवीन वाहने खरेदीची निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. रा.प. महामंडळाच्या ताफ्यात २०१६ पासून भाडेतत्वावरील ५५६ शिवशाही बसेस समाविष्ट झाल्या आहेत. रा.प. महामंडळाच्या ताफ्यात नवीन १५० इलेक्ट्रीक बसेस व ५०० साध्या बसेस भाडेतत्त्वावर घेण्याचा

निर्णय घेण्यात आलेला असून त्यातील काही बसेस रा.प. महामंडळाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. उर्वरित बसेस टप्प्याटप्प्याने मार्च २०२३ अखेरपर्यंत रा.प. महामंडळाच्या ताफ्यात समाविष्ट होतील. रा.प. महामंडळाच्या ताफ्यात ५१५० इलेक्ट्रीक बसेस भाडेतत्वावरील घेण्याबाबत संचालक मंडळाने मंजुरी दिली आहेत. सदर बसेसकरीता निविदा प्रक्रिया प्रगत करण्यात आली आहे.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत बायोमायनिंगच्या कामामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३) * १५५८० श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत दिनांक १३ सप्टेंबर, २०२० रोजी सेव्ह एनव्हारमेंट मॅनेजमेंट, पुणे या कंपनीला उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत सर्व्हे क्र. ३४८ येथील अस्तित्वात असलेल्या कचरा डेपोच्या ठिकाणी बायोमायनिंग काम करण्यासाठी रुपये ४६,५५,०७३ अदा करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २० फेब्रुवारी, २०२१ रोजी मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी सदर कामाचे Completion Certificate दिले असून सेव्ह एनव्हारमेंट मॅनजमेंट, पुणे या कंपनीला बायोमायनिंग च्या कामासाठी एकूण किती रक्कम अदा करण्यात आली आहे, तसेच कचऱ्याच्या बायोमायनिंगमुळे किती खत तयार झाले व त्यापोटी उस्मानाबाद नगरपरिषदेला किती फायदा झाला आहे,

(३) असल्यास, उस्मानाबाद नगरपरिषद अंतर्गत कचऱ्याचे ओला-सुका कचरा वेगळा केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बायोमायनिंगच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

उस्मानाबाद नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या मंजूर सविस्तर प्रकल्प अहवालानुसार ५२४४० घन मीटर कचऱ्यावर बायोमायनिंग पध्दतीने प्रक्रिया करण्याकरीता नगरपरिषदेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या सेव्ह एनव्हारमेंट मॅनजमेंट, पुणे या कंपनीला रूपये २,२२,८७,०००/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे.

सदर प्रक्रियेमुळे तयार झालेल्या खताची विक्री करण्यात आली नसून नगरपरिषेच्या उद्यानामध्ये त्या खताचा उपयोग करण्यात आल्याचे मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी कळविले आहे.

(३) हे खरे नाही.

शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी घरोघरी जावून कचरा गोळा करण्यात येणाऱ्या दैनंदिन कचऱ्याचे प्रमाण ६० मे.टन इतके आहे. शहरात एकूण निर्माण होणाऱ्या कचऱ्यापैकी ९०% कचऱ्याचे विलगीकरण करण्यात येत असल्याचे मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांनी कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामेटाकळी (ता.मानवत, जि.परभणी) येथील तीन कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामांची चौकशी करण्याबाबत

**(४) * १५९५९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामेटाकळी (ता.मानवत, जि.परभणी) येथील तीन कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या कामामध्ये नियमभंग केल्याप्रकरणी उपविभागीय अधिकारी, जलसंधारण विभाग, परभणी यांनी चौंडेश्वरी कन्स्ट्रक्शन यांना सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी नोटीस जारी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदार अधिकाऱ्यांना धाक दाखवून देयके वसूल करुन शासनाचे नुकसान करीत असल्याबाबतची लेखी तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांनी मा.जलसंधारण मंत्री यांच्याकडे सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) या अनुषंगाने शासनस्तरावर काटेकोरपणे तपासणी केली. अशा स्वरूपाची तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(३) रामेटाकळी को.प. बंधारा क्र. ३ या योजनेच्या संबंधित कंत्राटदाराने उपविभागाकडून कामाची आखणी करून न घेता परस्पर काम सुरु केल्यामुळे ते बंद करण्यात आले असून संबंधित कंत्राटदारास निविदा अटी व शर्तीनुसार नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुषंगाने संबंधित कंत्राटदाराने उपविभागाकडून पुनश्च: कामाची आखणी करून घेऊन त्यानूसार काम चालू केले आहे. संबंधित कंत्राटदाराने परस्पर चालू केलेल्या खोदकामाचे देयक अदा करण्यात आलेले नसल्याने शासनाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. त्यामुळे कंत्राटदारावर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमृत अभियानांतर्गत अकोला शहरात जलवाहिनी व पाणीपुरवठा योजनेच्या कामाकरीता नेमलेल्या एजन्सीने रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे अपूर्ण ठेवल्याबाबत

**(५) * १५२७८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमृत अभियान अंतर्गत अकोला शहरात (जि.अकोला) जलवाहिनीचे व पाणीपुरवठा योजनेचे काम करण्यासाठी तत्कालीन आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला यांनी एपी ॲण्ड जीपी या एजन्सीची नियुक्ती सन २०१७ मध्ये केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामासाठी शहरातील ५४६ कि.मी. अंतराची मुख्य जलवाहिनी तसेच प्रभागातील अंतर्गत जलवाहिनी तसेच नवीन ८ जलकुंभ उभारण्याच्या कामाचा समावेश होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, करारनाम्यानुसार सदर एजन्सीने खोदलेल्या रस्त्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असताना एजन्सीने रस्त्यांची दुरुस्ती केली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या एजन्सीविरुध्द कारवाई करुन रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकल्पातील प्रशासकीय मान्यतेनुसार एकूण ५०६.४० कि.मी. पाईपलाईन व एकूण ८ जलकुंभाच्या कामांचा समावेश आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

अकोला शहर पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत एपी ॲण्ड जीपी या एजन्सीच्या करारनाम्यात प्रशासकीय मान्यतेनुसार रोड दुरुस्तीकरीता ४५५८९ चौ.मी. परिणामाचा समावेश होता. तथापि, संबंधित कंत्राटदाराने आजतागायत एकूण ८९२०७.१३ चौ.मी. एवढ्या परिमाणाची रस्ते दुरुस्तीची कामे केली असून उर्वरित कामे करण्याचे अकोला महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून "पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर" करण्याबाबत

**(६) * १५११२ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी या गावी झाला असून त्यांच्या इतिहासाचे स्मरण होण्याच्या दृष्टीने अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून "पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर" करण्यात यावे अशी नागरिकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहमदनगरचे नामांतर करून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर' करण्याची मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून "पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर" करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, खरे आहे.
(३) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांचेकडून प्राप्त झालेल्या मागणीनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर व विभागीय आयुक्त, नाशिक यांना दिनांक ०७ सप्टेंबर, २०२२ च्या पत्रान्वये

कळविण्यात आले आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी केंद्र सरकारच्या गृह मंत्रालयाने त्यांचे पत्र क्रमांक १३०/५३, दिनांक ११ सप्टेंबर १९५३ व सुधारित दिनांक ११/०४/२००५ अन्वये विहित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार १) आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, २) व्यवस्थापक, विभागीय रेल्वे कार्यालय, अहमदनगर, ३) वरिष्ठ पोस्ट मास्तर, मुख्य पोस्ट ऑफिस, अहमदनगर व ४) तहसिलदार महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना माहिती सादर करण्याबाबत दिनांक ०३/११/२०२२ व दिनांक २२/११/२०२२ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्याबाबत

**(७) * १६१५७ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथील इंदू मिल परिसरात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे काम शासनाने कंत्राटदारांशी केलेल्या करारानुसार माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना सदरहू काम संथगतीने होत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम संनियंत्रण व जलदगतीने व्हावे यासाठी तत्कालीन मा.समाजकल्याण मंत्री यांचे अध्यक्षतेखाली मा.मंत्रिमंडळाची उपसमिती नेमून या समितीमध्ये तत्कालीन मा.नगरविकास मंत्री तथा विद्यमान मा.मुख्यमंत्री, तत्कालीन मा.शालेय शिक्षण मंत्री यांचा समोवश होता, सदर मा.मंत्रिमंडळ उपसमितीने इंदू मिल (दादर, मुंबई) येथील प्रकल्पाचे ठिकाणी तसेच उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे जाऊन भव्य पुतळा प्रतिकृतीची पाहणी केली असून पुतळा प्रतिकृतीमध्ये काही बदल सुचविले असल्याचे दिनांक १५ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारक प्रकल्पावर आतापर्यंत रुपये २४५ कोटी खर्च झाले असून या आर्थिक वर्षासाठी आणखी रुपये २०० कोटींचा निधी प्रकल्पासाठी राखून ठेवण्यात आल्याचे तसेच प्रकल्पाचे काम माहे मार्च, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे स्मारक मा.मंत्रिमंडळ उपसमितीचे तत्कालीन मा.अध्यक्ष व मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी प्रसारमाध्यमाद्वारे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर स्मारक प्रकल्पाच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे, तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या लंडन (परदेशात) येथील निवासस्थानी भव्य संग्रहालय उभारणीसाठी शासनाने केलेल्या रुपये १५ कोटी निधीबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्यांना लागलेला कालावधी, प्रकल्पातील स्मारकाची उंची ३५० फूटावरून ४५० फूट (पादपीठ १०० फूट व पुतळा ३५० फूट) करण्यात आले. तसेच कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या संकटामुळे निर्माण झालेली परिस्थिती यामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याच्या निर्धारित कालावधीत वाढ होवून सदर कालावधी मार्च, २०२४ झाला आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याकरीता कालबध्द कार्यक्रम आखण्यात आला असून काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) आजतागायत सद्य:स्थितीत प्रकल्पातील सहाय्यभूत इमारतीचे (प्रेक्षागृह, प्रदर्शनाकरीता दालने, संशोधन केंद्र, ग्रंथालय, परिषदा भरविण्यासाठी सभागृह, ध्यानधारणा केंद्र, परीक्रमा पथ, स्मरणिका विक्री केंद्र, प्रतिक्षालय, उपहारगृह, प्रशासकीय कार्यालय, स्वच्छता गृह, बगिचे, वाहनतळ, इ.) ५१ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे व स्मारकातील पादपीठ ११ टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वास्तव्य केलेल्या निवासस्थानाचे स्मारकात रूपांतर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई महामार्गाचे धर्तीवर नागपूर-गोवा महामार्ग बनविण्याबाबत

**(८) * १५३८२ श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गाचे धर्तीवर, नागपूर ते गोवा एक्सप्रेस वे (इकॉनॉमिक कॉरिडॉर) बनविण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे मा.उपमुख्यमंत्री यांनी नागपूर येथे नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल (नरेडको) विदर्भ चॅप्टरच्यावतीने आयोजित शासकीय कार्यक्रमात जाहीर केले असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या महामार्गाची लांबी किती आहे, त्यासाठी किती खर्च अपेक्षित असून महामार्गाच्या बांधकामास मा.मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे काय, तसेच सदरचा महामार्ग कोणकोणत्या जिल्ह्यातून जाणार आहे व तेथील जमिनी संपादनाबाबत व शासकीय यंत्रणांच्या परवानगीबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नागपूर ते गोवा द्रुतगती मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या आहेत. तथापि, या मार्गाची अंदाजे लांबी ७६० कि.मी. असून महामार्ग महाराष्ट्रातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, उस्मानाबाद, सोलापूर, सांगली, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यातून पुढे कोकण द्रुतगती महामार्गास गोवा महाराष्ट्र सरहद्दीवर जोडणे प्रस्तावित आहे. ढोबळ मानाने प्रकल्पाचा भूसंपादनासह अपेक्षित खर्च रुपये ८६,३०० कोटी एवढा आहे. प्रकल्पाची लांबी, जाणारे जिल्हे, प्रकल्पाचा एकूण खर्च इ. बाबी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार झाल्यानंतर निश्चित होतील. तद्नंतर सदर प्रकरणी मा.मंत्रिमंडळाची/ मंत्रिमंडळाच्या पायाभूत सुविधा समितीकडून मंजुरीचा प्रस्ताव सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्यांक आयोगाच्या योजनेंतर्गत कार्यरत शिक्षकांना किमान वेतन व माध्यमिक शिक्षकांचा दर्जा देण्याबाबत

**(९) * १५९३६ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इयत्ता आठवी, नववी व दहावीसाठी उर्दू व कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्यासाठी अल्पसंख्यांक आयोगाच्या योजनेंतर्गत ९३३ शिक्षक अनेक वर्षे कार्यरत असून सदरहू शिक्षकांना अत्यल्प मासिक वेतन रुपये ५००० एवढे मिळत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू शिक्षकांना कायम करुन किमान वेतनमान व सदर मानसेवी शिक्षकांना माध्यमिक शिक्षकांचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे.

राज्यातील इयत्ता आठवी, नववी व दहावीसाठी उर्दू व कन्नड शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्यासाठी अल्पसंख्यांक आयोगाच्या योजनेंतर्गत अमराठी शाळेत इयत्ता आठवी, नववी व दहावी मध्ये शिकणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मराठी शिकविण्याकरीता दिनांक २७/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार नऊ महिन्यांकरीता शिक्षकांची मानसेवी तत्त्वावर नेमणूक केली जाते. सद्य:स्थितीत या योजनेंतर्गत ४७६ मानसेवी शिक्षक कार्यरत आहेत.

(२) मराठी भाषा फाउंडेशन योजनेंतर्गत नियुक्त मानसेवी शिक्षकांना इयत्ता ८ वी ते १० वीच्या अमराठी माध्यमाच्या (उर्दू, कन्नड, इ.) शाळेतील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शाळेच्या वेळेनंतर मराठी भाषा शिकविण्याकरीता अतिरिक्त शिकवणी करीता मानसेवी शिक्षकांची मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येते. शासन निर्णय दिनांक २७/०४/२०१५ अन्वये सदर मानसेवी शिक्षकांनी शाळेच्या वेळेनंतर अतिरिक्त शिकवणी घेणे अपेक्षित असून त्यांची नियुक्ती १ जुलै ते ३१ मार्च या कालावधी करीता करण्यात येते. या कालावधीत त्यांना रुपये ५००० दरमाह मानधन देण्यात येते. शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर त्यांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येते. नवीन शैक्षणिक वर्षासाठी नव्याने नियुक्त्या करण्यात येतात. त्यामुळे सदर शिक्षकांना सेवेत कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहांमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१०) * १६००० श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात समाज कल्याण विभागाने वसतिगृहांवर टाकलेल्या धाडीत समाज कल्याण विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या ४४१ शासकीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना गैरसोय, अस्वच्छता आणि असुविधेला सामोरे जावे लागत असून बहुतांश वसतिगृहांमध्ये गृहपाल नाहीत, वसतिगृहाच्या नोंदवहीत विद्यार्थ्यांची नोंद असून प्रत्यक्षात विद्यार्थी नाहीत, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नाहीत, संगणक कक्ष, भोजन कक्ष, खिडकी नाही, स्नानगृह व स्वच्छतागृहाची दुरवस्था, पिण्याचे पाणी, ग्रंथालयाची सोय तसेच मुलींच्या वसतिगृहात सीसीटीव्ही यंत्रणा नसल्याचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसतिगृहात सोयी सुविधा देण्याकरीता रुपये ६४ कोटींचा निधी व वसतिगृहाच्या दुरुस्तीकरीता रुपये साडे सात कोटींचा निधी देण्यात येऊनही वसतिगृहात कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध झाल्या नसल्यामुळे विद्यार्थी सोयी सुविधांपासून वंचित राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय वसतिगृहांतील असुविधांबाबत विद्यार्थ्यांनी शासनाकडे तक्रारी केल्या असल्याने समाज कल्याण विभागाने टाकलेल्या धाडीमध्ये राज्यातील कोणकोणत्या वसतिगृहांचा समावेश आहे, त्यानुसार शासनाने राज्यातील सर्वच शासकीय वसतिगृहांची पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना आवश्यक सोयी सुविधा पुरविण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करुन वसतिगृहात सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) राज्यात सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय मुलामुलींसाठी एकूण ४४१ शासकीय वसतिगृहे चालविण्यात येत असून या वसतिगृहात एकूण ४३,३५८ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

सदर शासकीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांना शासनामार्फत कॉट, गादी, उशी, उशी कव्हर, बेडशीट, चादर, ब्लँकेट इत्यादी आवश्यक साहित्य पुरविण्यात येते. विद्यार्थ्यांना निवास व भोजन या व्यतिरिक्त दर महिन्याला खर्चासाठी पुढीलप्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येतो.

विभागीय स्तर - रुपये ८००/-

जिल्हा स्तर - रुपये ६००/-

तालुका स्तर - रुपये ५००/-

विद्यार्थ्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने समाज कल्याण आयुक्तालयाव्दारे सात विभागातील ५४ शासकीय वसतिगृहांची यादृच्छिकपणे (Randomly) तपासणी करण्यात आली. आयुक्त, समाज कल्याण यांनी क्षेत्रिय अधिकाऱ्यांसह आयोजित केलेल्या बैठकीत विभागांतर्गत मुलांच्या वसतिगृहात पुरूष अधिकारी/कर्मचारी यांनी तर मुलींच्या वसतिगृहात महिला अधिकारी/कर्मचारी यांनी वसतिगृह निवासी मुक्कामी प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्याचे निराकरण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासाठी संवाद उपक्रम राबविण्यात आला. सदर उपक्रमामध्ये काही वसतिगृहांमध्ये गृहपाल निवासी राहत नसणे, वसतिगृहात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय नसणे, ग्रंथालय नसणे, भोजनाबाबतच्या तक्रारी वसतिगृहातील स्वच्छता, संगणक बंद असणे, प्रवेशितांना निर्वाह भत्ता वेळेत न देणे, स्वच्छतागृहामध्ये वीजेची सोय नसणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत. आयुक्त, समाज कल्याण यांच्या आदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या पथकामार्फत राज्यातील ५४ शासकीय वसतिगृहांची अन्य जिल्ह्याच्या सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडून तपासणी करण्यात आली. यासाठी संबंधित ४९ शासकीय वसतिगृहांच्या गृहपालांना कारणे दाखवा नोटीस बजावून चौकशी करण्यात येत आहे. तसेच वसतिगृहात स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, ग्रंथालय सुविधा, संगणक कक्ष सुस्थितीत असणे, प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रलंबित निर्वाह भत्ता देणे, स्वच्छतागृहात वीजेची सोय करणे, शैक्षणिक साहित्य वेळेवर देणे इत्यादी कामे स्थानिक स्तरावर पूर्ण करण्याबाबत आवश्यक सूचना संबंधित गृहपाल व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * १५७८४ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : दिनांक ६ जुलै, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ४९६२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाचे प्रमुख असलेल्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या (आरटीओ) १६ पैकी १० महत्त्वाच्या शहरातील (मुंबईतील वडाळा, अंधेरी तसेच पनवेल, नागपूर शहर, नागपूर ग्रामीण, धुळे, नाशिक, कोल्हापूर, लातूर व औरंगाबाद) प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या जागा दोन वर्षे भरण्यात आलेल्या नाहीत, त्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालयातील (आरटीओ) कामे प्रलंबित राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची कामे पाहताना उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर कामाचा ताण येत असून महत्वाचे निर्णय घेण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयाकडे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची रिक्त असलेली पदे भरण्याबाबत निर्णय घेऊन परिवहन विभागाच्या नवीन आकृतीबंधासह नवीन १२ प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती परिवहन आयुक्तांनी माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रसिद्धीमाध्यमांना दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

ज्या कार्यालयातील प्रादेशिक परिवहन अधिकारी ही पदे रिक्त आहेत तेथे अन्य अधिकाऱ्यांकडे प्रादेशिक परिवहन अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून संबंधित कार्यालयीन कामकाजाचा निपटारा करण्यात येत आहे.

(२) व (३) नाही.

(४) प्रादेशिक परिवहन अधिकारी संवर्गातील रिक्त पदे पदोन्नतीने भरणेची बाब कार्यवाहीखाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्ता प्रलंबित असल्याबाबत

**(१२) * १५८५३ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.महादेव जानकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.प्रवीण दटके, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय विभागाच्या ४४५ वसतिगृहांतील विद्यार्थ्यांचा निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य, गणवेश भत्ता, छत्र्या, रेनकोट आणि प्रकल्प अहवालासाठी आवश्यक देय भत्ता मागील सहा महिन्यापासून रखडला असल्याचे, चेंबूर (मुंबई) येथील संत एकनाथ मुलांचे शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतलेल्या

विद्यार्थ्यांना मागील ३ शैक्षणिक वर्षांचे देय भत्ते मिळालेले नसल्याचे तसेच कोरोना काळातील १९ महिन्यांचा निर्वाह भत्ता देण्यात आला नसल्यामुळे विद्यार्थांची आर्थिक अडचण होऊन शिक्षणावर विपरित परिणाम होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांची थकीत भत्त्यांची देय रक्कम बँक खात्यात जमा करण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली असून सदर मागणी मान्य न झाल्यास, विद्यार्थी कृती समिती व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत सर्व संघटनांतर्फे आयुक्त, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा कृती समितीचे दादाराव पंजाबराव नांगरे यांनी सहाय्यक आयुक्त, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना काळामध्ये सामाजिक न्याय विभागाची सर्व वसतिगृहे तसेच महाविद्यालये, शाळा बंद असूनही ऑनलाईन पध्दतीद्वारे शिक्षण सुरु होते, वसतिगृहातील बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागातील असून गावांमध्ये इंटरनेटची जोडणी नसल्याने ऑनलाईन शिक्षण घेण्याकरीता विद्यार्थी शहराच्या ठिकाणी भाड्याच्या खोलीत राहत होते, सदर कालावधीत केवळ वसतिगृहे बंद असल्याचा निकष लावून सामाजिक न्याय विभागाने निर्वाह भत्ता आणि शैक्षणिक साहित्यांच्या खर्च विद्यार्थ्यांना देण्यास नकार दिल्यामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना बाहेर भाड्याच्या खोलीत राहून शिक्षण पूर्ण करता यावे याकरीता स्वाधार योजना सुरु करण्यात आली असून कोरोना काळात स्वाधार योजनेच्या लाभार्थींना सर्व लाभ देण्यात आले, मात्र वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना कोरोना काळात केवळ वसतिगृह बंद असल्याचे कारणामुळे निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्त्यापासून वंचित ठेवण्यात आले, त्यामुळे समान तत्वावर सुरु असलेल्या दोन योजनांच्या लाभार्थींमध्ये शासनाकडून फरक करण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांनी नाराजी व्यक्त केली असून कोरोना काळातील निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य भत्ता मिळण्याची मागणी विद्यार्थ्यांनी लेखी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचा रखडलेला निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य भत्ता आदी तसेच कोरोना काळातील १९ महिन्यांचे भत्ते देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) संत एकनाथ मुलांचे शासकीय वसतिगृह, चेंबूर येथील सन २०२२-२३ या वर्षाचे एप्रिल, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ पर्यंतचा निर्वाह भत्ता व सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचे शैक्षणिक साहित्य, छत्र्या, रेनकोट इत्यादी विद्यार्थ्यांना देण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सन २०१९-२० या वर्षाचा निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्य, छत्र्या, रेनकोट इत्यादीसाठी आवश्यक रक्कम तसेच ऑक्टोबर, २०२१ ते सप्टेंबर, २०२२ पर्यंतचा निर्वाह भत्ता व सन २०२२-२३ चे शैक्षणिक साहित्य, छत्र्या, रेनकोट इत्यादी देण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे आहे.

याबाबत सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर यांचेकडे निवेदन देण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २६ जुलै, २०११ च्या शासन निर्णयानुसार निर्वाह भत्ता हा केवळ वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांनाच देय आहे. त्यामुळे कोरोना काळातील भत्ते देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाशी (नवी मुंबई) येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१३) * १५५६० श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशी, नवी मुंबई येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय साहित्याचा तुटवडा जाणवत असल्यामुळे साहित्य बाहेरुन खरेदी करावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकीय साहित्यांचा तुटवडा झाल्यामुळे गरिब व गरजू रुग्णांची गैरसोय होत असून वैद्यकीय साहित्य बाहेरुन खरेदी करावे लागत असल्यामुळे आर्थिक भार सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेचे नेरुळ, वाशी व ऐरोली येथे सार्वजनिक रुग्णालय असून येथे पाच व सहा मजल्याची सुसज्ज इमारत असून येथे फक्त बाह्यरुग्ण तपासणी होत असल्यामुळे रुग्णांना पूर्णपणे वाशी येथील रुग्णालयावर अवलंबून रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाशी, नवी मुंबई येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय साहित्य उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

- यासंदर्भात कोणतीही तक्रार महानगरपालिकेस प्राप्त नाही.
- नवी मुंबई महानगरपालिकेच्या नेरूळ, वाशी, ऐरोली सार्वजनिक रूग्णालयात व माता बाल रूग्णालय बेलापूर व तुर्भे येथील सर्व रूग्णांना वैद्यकीय साहित्य विनामूल्य पुरविण्यात येते.
- नवी मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०१/०२/२०२१ पासून Zero Prescription योजना सुरू केलेली आहे.
- नवी मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयात माहे ऑक्टोबर-२०२२ मध्ये रूग्णांवर उपचार करणेकरीता लागणाऱ्या आवश्यक वैद्यकीय साहित्याचा पुरेशा प्रमाणात साठा उपलब्ध असल्याने, रूग्णांची गैरसोय झाली, हे वस्तुस्थितीस धरून नाही.

(३) व (४) • नवी मुंबई महानगरपालिकेच्या रूग्णालयात माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये दाखल झालेल्या रूग्णांची संख्या पुढीलप्रमाणे आहे :-

| रूग्णालयाचे नाव | आंतररूग्ण | बाह्यरूग्ण |
|---|---|---|
| सार्वजनिक रूग्णालय, नेरूळ | १३३५ | १८३५९ |
| सार्वजनिक रूग्णालय, वाशी | २२५२ | १५९७२ |
| सार्वजनिक रूग्णालय, ऐरोली | १०२७ | २०९१६ |

- नवी मुंबई महानगरपालिकेच्या वाशी, नेरूळ व ऐरोली येथील रूग्णालयांमध्ये उपचाराकरीता येणाऱ्या रूग्णांना वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार, रूग्णालयात दाखल करण्यात येऊन त्यांच्यावर उपचार करण्यात येतात.
- सदर रूग्णालयातील बेडची संख्या वाढविण्यात आलेली असून, सार्वजनिक रूग्णालय वाशी-३००, नेरूळ-२८० व ऐरोली येथे २०० बेड कार्यरत करण्यात आलेले आहेत.
- सार्वजनिक रूग्णालय, नेरूळ येथे यापूर्वी मेडीकल, सर्जिकल व आय.सी.यु. सुविधा उपलब्ध नव्हत्या, त्यादेखील पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आलेल्या आहेत.
- माता बाल रूग्णालय, तुर्भे येथे ५० बेड पूर्ण क्षमतेने सुरू करण्यात आलेले आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेतील रूग्णालयात कोणत्याही रूग्णांची गैरसोय होऊ नये, याकरीता प्रभावी रूग्णसेवा उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लांजा (जि.रत्नागिरी) बस स्थानकाचे नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१४) * १५४२५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा महामार्गावरील लांजा (जि.रत्नागिरी) बस स्थानकाची इमारत नादुरुस्त व मोडकळीस आली असून प्रवाशांसाठी ती पुरेशी नसल्याने लांजा बस स्थानकाचे आधुनिकीकरण करुन अद्ययावत व प्रवाशांचे दृष्टीने सुसज्ज असे बस स्थानक उभारण्यात यावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून लांजा तालुक्यातील स्थानिक तसेच कोकणात जाणाऱ्या मुंबईकर नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाच्या नूतनीकरणाच्या कामासाठी रुपये १ कोटी ७५ लाखांचा निधी शासनाने मंजूर केल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्याचे तत्कालीन मा.पालकमंत्री यांच्या हस्ते माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये या इमारतीच्या कामाचे भूमिपूजन होऊन कामास सुरुवात झाली, तद्नंतर तीन वर्षे होऊनही बसस्थानकाच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू कामाच्या कंत्राटदाराने केवळ तळाचा भाग बांधकाम करुन अर्धवट पिलर उभे केले आहेत, सदर पिलर वरील शिगांना गंज पकडला असून तीन वर्षे पावसात भिजून सर्वच बांधकाम निकामी झाले आहे तसेच सर्वत्र लहान लहान झुडपे उगवल्याने परिसराची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू बस स्थानकाच्या उभारणीचे काम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लांजा बसस्थानकाचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या दोषींसह कंत्राटदाराविरुध्द कारवाई करुन सदर बस स्थानक नूतनीकरणाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय.
(४), (५) व (६) मे.एस.व्ही. एंटरप्रायजेस, पुणे यांनी कार्यादेश मिळाल्यापासून काम सुरु केले. मात्र कोरोना संक्रमणात काम रखडले, नंतर वारंवार पत्रव्यवहार करुनही काम सुरु केले नसल्याने कंत्राटदार मे.एस.व्ही.एंटरप्रायजेस, पुणे यांचे करारपत्रातील अटी व शर्तीनुसार काम रद्द करण्यात आले असून, त्यांनी भरलेली सुरक्षा रक्कम जप्त करण्यात आली आहे. तसेच त्यांच्या संस्थेस काळया यादीत टाकण्यात आले आहे. उर्वरित कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात प्रवासी वाहनांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बंधनकारक केलेली यंत्रणा हाताळण्यासाठी मुख्य नियंत्रण कक्ष स्थापन करण्याबाबत

**(१५) * १६२६० श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.प्रसाद लाड, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात काळी-पिवळी टॅक्सी, टुरिस्ट टॅक्सी, प्रवासी बससह सार्वजनिक वाहनांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पॅनिक बटन, व्हेईकल ट्रॅकिंग (जीपीएस) यंत्रणा माहे जानेवारी, २०१९ पासून बंधनकारक करण्यात आली असतानाही सदर यंत्रणा हाताळण्यासाठी शासनाकडून "मुख्य नियंत्रण कक्ष" स्थापन झाला नसल्यामुळे तसेच शासनाचे नियंत्रण नसल्यामुळे ४ वर्षांनंतरही शासनाने घेतलेल्या या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मुंबईतील रिक्षा आणि टॅक्सीचालक विविध कंपन्यांच्या मीटरमध्ये बिघाड करुन प्रवाशांची आर्थिक लूट करीत असल्याने रिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या मीटरमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी जीपीएस आधारित मीटर प्रणाली सुरु करण्याची आवश्यकता असल्याचे दिनांक १५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिल्लीच्या धर्तीवर मुंबईतही जीपीएस मीटर लावण्याबाबत परिवहन विभागाने सुचविलेल्या बाबींसंदर्भात अद्याप निर्णय झाला नसल्यामुळे प्रवाशांची सर्रासपणे लुट होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रवासी वाहनांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेसाठी बंधनकारक करण्यात आलेली यंत्रणा हाताळण्यासाठी मुख्य नियंत्रण कक्ष स्थापन करण्याबाबत तसेच मुंबईत रिक्षा, टॅक्सीच्या मीटरमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी जीपीएस आधारित मीटर प्रणाली सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

तथापि, अशा आशयाची बातमी वृत्त पत्रात दिनांक १५/१०/२०२२ रोजी प्रसिध्द झाली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १३७ नुसार राज्यातील सर्व काळया पिवळया मीटर ऑटोरिक्षा व टॅक्सींना इलेक्ट्रॉनिक मीटर बसविणे अनिवार्य केले आहे.

तथापि, उक्त नियमाप्रमाणे जीपीएस आधारित मीटर प्रणाली बसविण्याची तरतूद नाही.

(३), (४) व (५) व्हेईकल लोकेशन ट्रॅकिंग डिव्हाईस बसविलेल्या वाहनांचे नियंत्रण करण्याकरीता मुख्य नियंत्रण कक्ष स्थापन करण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

-----------------

## राज्यात पावसामुळे घरांची पडझड झालेल्या नागरिकांना सरसकट मदत देण्याबाबत

**(१६) * १५८२८ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पावसामुळे घरांची पडझड झाल्यास बाधितांना मदत देण्याच्या निकषांमध्ये सदर दिवशी किमान ६५ मि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस झाल्यास नागरिक मदतीसाठी पात्र ठरत असून कमी पावसामुळे बाधित झालेले नागरिक मदतीपासून वंचित राहत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निकषांमध्ये बदल करुन पावसामुळे पडझड झालेल्या घरांना सरसकट मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

विविध नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित नागरिकांना विहित निकषानुसार मदत अनुज्ञेय आहे. अतिवृष्टीकरीता २४ तासांमध्ये ६५ मि.मी. पेक्षा जास्त पाऊस हा निकष विहित केलेला आहे.

(२) केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या आपदग्रस्तांना द्यावयाच्या मदतीचे दर व निकष शासन निर्णय, दिनांक १३/०५/२०१५ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. तसेच शासन निर्णय, दिनांक ३०/०१/२०१४ मध्ये राज्याने काही नैसर्गिक आपत्ती जाहीर केल्या आहेत. त्यानुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे. निकषा बाहेरील बाबींकरीता राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत अनुज्ञेय नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * १५२४२ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड आणि पुणे या दोन शहरांना जोडणाऱ्या मुळा नदीवरील वाकड ते बालेवाडी पूल गेल्या दोन वर्षापासून रुपये २३.६६ कोटी खर्च करुन बांधून तयार असून पुण्याकडील बाजुस रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जमिनीचा ताबा न मिळाल्यामुळे पूल आणि रस्ता अद्यापही नागरिकांना ये-जा करण्यासाठी उपलब्ध करुन दिला नसल्याने दीड ते दोन लाख नागरिकांना बालेवाडीला वळसा मारुन जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने केवळ प्रकल्प निर्मितीवर भर दिला जात असला तरी नियोजनाअभावी अनेक प्रकल्प तयार होऊन त्याची अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर पूल आणि रस्ता नागरिकांना ये-जा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) बालेवाडी स.नं.४६/४७ जवळ मुळा नदीवर पूल बांधण्याचे काम पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमानाने व आर्थिक सहभागातून करण्यात आले आहे.

या पूलामुळे पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका एकमेकांशी कस्पटे वस्तीजवळ जोडले जाणार असून दोन्ही महानगरपालिका हद्दीतील नागरिकांना पर्यायी रस्ता उपलब्ध होणार आहे.

पूलाची एकूण लांबी १७५ मीटर, रूंदी ३० मीटर असून पोहोच रस्त्याची लांबी बालेवाडी बाजूस २३.१३ मीटर व वाकड बाजूस ३६.११ मीटर आहे.

सदर रस्त्याच्या कामाचा कार्यादेश पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कोर्पोरेशन लि. यांच्यामार्फत देण्यात आले असून यासाठी एकूण ६५० मीटर लांबीचा ॲप्रोच रोड आहे. यापैकी ३५० मीटर लांबीच्या रस्त्याचे क्षेत्र तडजोडीने ताब्यात घेण्यात आले आहे. उर्वरित ३०० मीटर लांबीच्या रस्त्याचे क्षेत्र तडजोडीने घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

# भायखळा (मुंबई) येथील माझगांव परिसरातील बी.आय.टी. चाळीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१८) * १६०७१ ॲड.अनिल परब, श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील माझगांव परिसरातील बी.आय.टी. चाळीचा पुनर्विकास गत १७ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून मा.न्यायालयाने सदरहू चाळींचा पुनर्विकास महानगरपालिकेने करावा असे निर्देश दिले असूनही महानगपालिका जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील १०० पेक्षा जास्त बी.आय.टी. चाळी धोकादायक घोषित करण्यात आल्या असून रहिवाशी सदरहू धोकादायक चाळीत राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील बीडीडी चाळीच्या धर्तीवर बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास करण्यात यावा, अशी मागणी मुंबईतील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माझगाव परिसरातील बी.आय.टी. चाळीसह मुंबई शहरातील बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) माझगांव ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळींच्या पुनर्विकासाकरीता मे.ग्रेस ॲन्ड रबरवाला सिटी डेव्हलपर्स यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक १६/०५/२००८ रोजी इरादापत्र देण्यात आले होते. दरम्यानच्या काळात विविध न्यायालयीन प्रकरणामुळे तसेच माझंगाव बी.आय.टी. चाळ निवासी वसाहत बचाव कृती समिती आणि इतर यांनी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्यामुळे पुनर्विकासाचे प्रकरण प्रलंबित होते असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

तद्नंतर विकासकाने पुनर्विकासातील विद्यमान इमारती दुरुस्त करण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे विकासकास देण्यात आलेले दिनांक १६/०५/२००८ रोजीचे इरादापत्र महानगरपालिकेने दिनांक ०३/०५/२०१८ रोजी रद्द केले. त्यानुषंगाने विकासक मे.ग्रेस ॲन्ड रबरवाला सिटी डेव्हलपर्स यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक ३४४१ / २०१८ दाखल केली असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मा.न्यायालयाने भायखळा (मुंबई) येथील माझगांव परिसरातील ताडवाडी बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास महानगरपालिकेने करावा असे निर्देश दिले नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत २२ वसाहतींमध्ये १३३ बी.आय.टी. इमारती आहेत. त्यापैकी ६१ इमारतीमध्ये महानगरपालिका भाडेकरुंच्या गृहनिर्माण संस्थांमार्फत नेमणूक केलेल्या विकासकांकडून पुनर्विकास प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत. सदर ६१ इमारतींपैकी १७ इमारतींचा पुनर्विकास झाला असून ४४ इमारतींच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर आहे.

उर्वरित ७२ इमारतींचे महानगरपालिकेमार्फत संरचनात्मक परिक्षण करण्यात आले आहे. सदर इमारती दुरुस्ती योग्य असल्याने महानगरपालिकेमार्फत त्यांची नियमित दुरुस्ती करण्यात येते. सद्य:स्थितीत १२ इमारतींच्या दुरुस्तीचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(३) माझगांव ताडवाडी येथील बी.आय.टी. चाळ वसाहत पुर्नविकासाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक २२/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

तसेच, मुंबईतील बी.डी.डी. चाळ पुनर्विकासाचे धोरण बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बी.आय.टी. चाळ पुनर्विकासाकरीता राबविण्याबाबत स्थानिक नगरसेवक यांनी मा.उपमुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक १६/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

(४) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या विनियम ३३(९)(बी) मध्ये बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याची तरतूद आहे. तसेच विनियम ३३(७) व ३३(९) अन्वये बी.आय.टी. चाळींचा पुनर्विकास करण्यात येतो. बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाच्या धर्तीवर बी.आय.टी चाळींचा पुनर्विकास करण्याची बाब धोरणात्मक असल्याने त्याबाबत सर्व शक्यता तपासण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोरीवली रेल्वे स्थानकाच्या पूर्व व पश्चिमेकडील रस्ते फेरीवाला मुक्त करण्याबाबत

**(१९) * १५५१० श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोरीवली रेल्वे स्थानक (पश्चिम) येथील एस.व्ही.रोड, एल.टी. मार्ग, चंदावरकर लेन आणि इंद्रप्रस्थ परिसर, तसेच पूर्वेकडील एम.जी.रोड, कार्टर रोड येथील पदपथ आणि निम्मे रस्ते फेरीवाल्यांनी अनधिकृतपणे व्यापलेले असल्याने आणि उरलेल्या निम्म्या रस्त्यावरून वाहने धावत असल्याने नागरिकांना धोकादायक प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदपथावरुन चालणे हा पादचाऱ्याचा मूलभूत अधिकार असतानाही या ठिकाणी फेरीवाल्यांनी अनधिकृतरित्या पदपथ व्यापलेले असल्याने वृध्द, विद्यार्थी आणि नोकरदार महिलांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोरीवली रेल्वे स्थानक पश्चिम व पूर्वेकडील रस्ते फेरीवाला मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमधील एम.जी.रोड, कार्टर रोड, एस.व्ही.रोड, एल.टी.रोड, चंदावरकर लेन तसेच इंद्रप्रस्थ लगत बोरीवली रेल्वे स्थानक आहे. बोरीवली रेल्वे स्थानकामधून लोकल रेल्वे सुटतात तसेच तेथे लांब पल्ल्याच्या बाहेरगावी जाणाऱ्या रेल्वे गाड्या

देखील थांबतात. एस.व्ही. रोड, एल.टी. रोड, चंदावरकर लेन आणि इंद्रप्रस्थ ही ठिकाणे रेल्वे स्थानकाजवळ असल्याने दुकानात खरेदीसाठी येणाऱ्या प्रवासी लोकांची गर्दी होते. तसेच सदर रस्ते अरुंद असल्याने वाहनांची वाहतूक मंदावते. परिणामी रस्त्यांवर गर्दी होते. त्यामुळे सदर रस्ते हे दररोज गजबजलेले असतात, ही वस्तुस्थिती आहे.

माहे ऑक्टोबर, २०२२ हा दिवाळी सणाचा महिना असल्याने या परिसरात गर्दीचे प्रमाण जास्त होते.

(३) सदर रस्त्यांवर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१/१०/२०२२, ०३/१०/२०२२, ०६/१०/२०२२, ०७/१०/२०२२, ०८/१०/२०२२, १०/१०/२०२२, ११/१०/२०२२, १४/१०/२०२२, १७/१०/२०२२, २७/१०/२०२२, २९/१०/२०२२, ३१/१०/२०२२, ०२/११/२०२२, ०३/११/२०२२, ०५/११/२०२२, ०९/११/२०२२, १२/११/२०२२ व १४/११/२०२२ रोजी अतिक्रमण निर्मुलनाची कारवाई करण्यात आली आहे. सदर कारवाईमध्ये महानगरपालिकेमार्फत रुपये ३०,०७,९८०/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

या रस्त्यांवर फेरीवाल्यांमुळे होणारी गर्दी कमी करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

- रस्त्यांवर फेरीवाल्यांना बसू न देण्यासाठी अतिक्रमण निर्मुलन वाहन उभे ठेवण्यात येते.
- निष्कासनाची कारवाई करण्याकरीता अतिक्रमण वाहनांमार्फत गस्त घालण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील चारा छावण्यांची देयके प्रलंबित असल्याबाबत

**(२०) * १५८७५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१९ मधील दुष्काळी परिस्थितीत मंगळवेढा व सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील जनावरांच्या छावणी चालकांची रुपये ३८ कोटींची देयके प्रलंबित असून सदरहू चारा छावण्या बंद होऊन ३ वर्ष होऊनही छावणी चालकांना त्यांची देयके मिळण्याऐवजी महसूल खात्याकडून दंडाच्या नोटीसा बजावण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे मे, २०२२ मध्ये तत्कालीन मा.मदत व पुनर्वसन मंत्री महोदयांकडे यासंदर्भात बैठक होऊन संबंधित दोन तालुक्यातील तहसिल स्तरावरील जनावरांच्या हजेरीच्या नोंदी ग्राह्य धरुन १५ दिवसात छावणी चालकांना देयके अदा करण्याच्या सूचना मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांनी देवूनही छावणी चालकांना अद्याप देयके अदा करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित चारा छावणी चालकांची प्रलंबित देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

चारा छावण्या बंद झाल्यानंतर तीन वर्षानंतर कोणत्याही छावणीस नोटीस देण्यात आलेली नाही.

चारा छावण्या सुरु असताना आकस्मिक तसेच नियमित तपासणीमध्ये आढळून आलेल्या पशुसंख्येच्या तफावतीबाबत संबंधित चारा छावण्यांना वेळोवेळी संबंधित तहसिलदार यांच्याकडून नोटीस देण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीशीच्या अनुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर यांचे समक्ष दिनांक १६/०९/२०१९ रोजी तहसिल कार्यालय, सांगोला व मंगळवेढा येथे सुनावणी घेण्यात आली होती. त्यानुसार उप विभागीय अधिकारी, मंगळवेढा यांनी माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये दंडाचे आदेश पारीत केले आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील चारा छावण्यांच्या प्रलंबित देयकांबाबत तत्कालीन मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांचेकडे दिनांक ३०/०५/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मा.मंत्री महोदयांनी शौर्य इन्फोटेक यांच्या Cattle Camp Management System या app मधील तांत्रिक चुकांमुळे त्यांची जनावरांची आकडेवारी ग्राह्य न धरली गेली असल्यास, पशुपालक समिती (ग्रामस्तरीय) यांचे दैनंदिन अहवाल तसेच संबंधित तहसिलदार यांच्या अहवालानुसार जनावरांची संख्या याचे विवेचन करून त्यानुसार प्रस्ताव तात्काळ सादर करावा असे निर्देश दिले होते.

तत्कालीन मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा दिनांक १३/०७/२०२२ रोजीचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांच्यामार्फत शासनास दिनांक ०१/०८/२०२२ रोजी प्राप्त झाला.

सदरहू प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समितीच्या दिनांक ०६/०९/२०२२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निर्णयार्थ सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये प्रस्तुत विषयावर सांगोपांग चर्चा झाली. चर्चेअंती घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सुधारित प्रस्ताव सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना दिनांक ३/१०/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून सुधारित प्रस्ताव प्राप्त होताच, सदर प्रस्ताव मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील राज्य कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहे.

-----------------

## नवी मुंबईतील सिडको प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना भूखंड देण्याबाबत

**(२१) * १५६४९ श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १२२५२ ला दिनांक १६ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई शहराची उभारणी करण्यासाठी शासनाने ठाणे, पनवेल व उरण या तीन तालुक्यांतील ९५ गावांतील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी ह्या एका राजकीय पक्षाच्या नेतृत्वाखालील सन १९८४ च्या आंदोलनात शेतकरी हुतात्मा झाल्यामुळे साडे बारा टक्क्यांसह भूखंड विकसित करण्याचा निर्णय होऊन भूखंड संपादित केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत किती प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना साडे बारा टक्क्याचे भूखंड वितरित करण्यात आले व किती लाभार्थी वंचित आहे, प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना साडे बारा टक्क्यांचे भूखंड देण्याचे धोरण कधीपर्यंत पूर्ण करण्यात येईल,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना साडे बारा टक्क्यांचे भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील एकूण ९५ गावांतील जमिनी नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आल्या आहेत.

सदर संपादित झालेल्या जमिनीपोटी पात्र प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के योजनेंतर्गत विकसित भूखंड शासन निर्णय, दिनांक ०६/०३/१९९० व दिनांक २८/१०/१९९४ मधील तरतुदीनुसार वाटप करण्यात येते. त्याअंतर्गत आजतागायत प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना १२.५ टक्के योजनेंतर्गत ८१३.१० हे.आर. जमिनीचे वाटप करण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त सुमारे ५७.२२ हे.आर. जमीन वाटपासाठी शिल्लक असून सिडकोमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) संबंधित प्रकल्पग्रस्तांमधील कौटुंबिक वाद, १२.५ टक्के योजनेसाठी आरेखित भूखंडांवरील गरजेपोटी बांधकामे, कांदळवने, CRZ Wetland, असंपादित क्षेत्र, दस्तऐवजाअभावी पात्रताधारकाची अपात्रता इ. कारणांमुळे विलंब होतो.

-----------------

## राज्यातील महानगरपालिकेचा महापौर थेट जनतेतून निवडून आवश्यक कार्यकारी अधिकार प्रदान करण्याबाबत

**(२२) * १५१८१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल (कॅग) यांनी राज्यातील महानगरपालिकेचा महापौर थेट जनतेतून निवड करावी व ही निवड पाच वर्षासाठी करावी तसेच या महापौरांना आवश्यक कार्यकारी अधिकारही प्रदान करण्यात यावेत, यासाठी कायद्यात सुधारणा करावी, अशी भारताचे नियंत्रक आणि महालेखापाल यांनी (कॅग) च्या अहवालातून दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास राज्य शासनास शिफारस केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील महापौर आणि नगराध्यक्षाची कार्ये आणि कार्यकारी अधिकारी यांची तुलना केल्यास नगराध्यक्षांना महापौरापेक्षा जास्त अधिकार आहेत, तसेच सद्य:स्थितीत महापौरांना कोणतेही कार्यकारी अधिकार नाहीत, शासनाने नियुक्त केलेले आयुक्त हेच मुख्य कार्यकारी असतात, तर नगरपरिषदेच्या स्थायी समितीचा अध्यक्ष हे नगराध्यक्ष असतात, नगराध्यक्षांच्या तुलनेत महापौरांना कोणतेच विशेष अधिकार नाहीत असेही कॅगने आपल्या सदरहू अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक स्वराज्य संस्था सक्षम करण्यासाठी केंद्र शासनाने सन २००३ मध्ये आणि सन २००७ मध्ये महापौर, नगराध्यक्ष यांचा कालावधी महानगरपालिकेच्या कालावधी इतका म्हणजेच पाच वर्षाचा असावा, अशी शिफारस केली होती, त्यानंतर बहुतांश राज्यांनी यावर अंमलबजावणी केली आहे, तसेच सध्याच्या महापौरांना कोणतेही अधिकार नाहीत आणि त्यांची निवड पाच वर्षाऐवजी अडीच वर्षासाठीच केली जात आहे, परिणामत: नागरी संस्थांना सक्षम करणे आणि विकासकामे वेगाने मार्गी लावण्यात बाधा येत असल्याचे निरीक्षणही कॅगने नोंदविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कॅगच्या सदरहू अहवालातील शिफारशीसंदर्भात निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर शिफारशीच्या अनुषंगाने उचित निर्णय घेण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील प्रकल्पबाधितांना खाजगी जमीनधारकांप्रमाणे आर्थिक मोबदला देण्याबाबत

**(२३) * १५१२५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पग्रस्तांना योग्य मोबदला न दिल्याने महानगरपालिकेकडून मुंबईत सुरु असलेले अनेक प्रकल्प रखडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका महत्त्वाच्या प्रकल्पासाठी भूसंपादन करताना खाजगी जमिनीवरील गाळेधारकांना रेडीरेकनर दराच्या १०० टक्के आणि झोपडपट्टी क्षेत्रात रेडीरेकनर दराच्या ७५ टक्के आर्थिक मोबदला देत असल्याचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्प बाधितांसाठी निश्चित करण्यात आलेला मोबदला अत्यंत कमी असल्याने प्रकल्प बाधित घर सोडण्यास तयार होत नसल्यामुळे मुंबईतील बहुतांश प्रकल्पांचे भूसंपादन पूर्ण होवू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील भूसंपादनामुळे प्रलंबित राहिलेले प्रकल्प मार्गी लागण्यासाठी प्रकल्पबाधितांना खाजगी जमीनधारकांप्रमाणे आर्थिक मोबदला देण्याबाबत तसेच अशा प्रकल्पग्रस्तांना २०० टक्के भरपाई देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत घोषित करण्यात येणाऱ्या विशेष प्रकल्पांमध्ये बाधित असलेल्या पात्र बांधकामधारकास पर्यायी सदनिका किंवा ऐच्छिक आर्थिक मोबदला देण्याची तरतूद आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/दक्षिण विभागातील पोईसर नदी रुंदीकरण प्रकल्प हा विशेष प्रकल्प म्हणून घोषित करण्यात आला आहे. सदर प्रकल्पामध्ये बाधित पात्र बांधकाम धारकांकडून कांदिवली व नजीकच्या परिसरात पुनर्वसन करण्याची मागणी होत आहे. परंतु, सद्य:स्थितीत नजीकच्या परिसरात पीएपी सदनिका उपलब्ध नसल्याने तेथे त्यांचे पुनर्वसन करणे शक्य होत नाही. तसेच, सदर प्रकल्पामधील बाधित पात्र बांधकामधारकांना आर्थिक मोबदला देण्यासाठी निधी उपलब्धतेची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०६/०२/२०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये, मुंबईतील प्रकल्पबाधितांना आर्थिक मोबदल्याचे अधिदान खालीलप्रमाणे करण्यात येते :-

- खाजगी जमिनीवरील अनिवासी प्रकल्पबाधितांना आर्थिक मोबदला रक्कम = (अनुज्ञेय क्षेत्रफळ x तळमजल्यावरील अनिवासी गाळयाचे मुद्रांकशुल्क सिध्दगणक दर)
- झोपडपट्टी क्षेत्रात आर्थिक मोबदला रक्कम = ०.७५ x (अनुज्ञेय क्षेत्रफळ किंवा २२५ चौ.फूट यापैकी जे कमी असेल ते क्षेत्रफळ x तळमजल्यावरील अनिवासी गाळयाचे मुद्रांक शुल्क सिध्दगणक दर)

बृहन्मुंबई महानगरपालिकेने महापालिकेच्या अत्यावश्यक नागरी प्रकल्पाने बाधित, निवासी प्रकल्पाने बाधित व महापालिकेच्या मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीतील भाडेकरु यांना पर्यायी निवासी सदनिका ऐवजी आर्थिक ऐच्छिक मोबदला देण्याचे धोरण तयार केले आहे. सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत दिनांक १२/११/२०२१ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे. सदर धोरणान्वये, दिनांक १७/०४/१९६४ पुर्वीच्या क्षमापित अथवा मंजुरीप्राप्त अधिकृत निवासी बांधकामांना आस्तित्वातील बांधीव क्षेत्रावर प्रचलित मुद्रांक शुल्क सिध्दगणक दराच्या १०० टक्के दराने (अस्तित्वातील चटईक्षेत्र x १.२० x मु.शु.सि.द. x १००%) आणि संरक्षणपात्र झोपडीधारकांना आस्तित्वातील बांधीव क्षेत्रावर प्रचलित मुद्रांक शुल्क सिध्दगणक दराच्या ७५ टक्के दराने (अस्तित्वातील चटईक्षेत्र x १.१० x मु.शु.सि.द. x ७५%) आर्थिक मोबदला देण्याचे निश्चित केले आहे. तसेच सरंक्षित झोपडीधारक यांना आर्थिक मोबदला देण्याची कमाल मर्यादा ५० लाख इतकी आहे.

सदर दोन्ही धोरणांची विभाग स्तरावर अंमलबजावणी करण्याच्या सूचना महानगरपालिकेमार्फत दिनांक १८/०८/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(३) उपरोक्त धोरणांनुसार पोईसर नदी रुंदीकरण प्रकल्प बाधितांना महानगरपालिकेमार्फत मिळणारा आर्थिक मोबदला हा प्रकल्प बाधितांच्या अपेक्षेने कमी असल्याने प्रकल्पबाधित घर सोडण्यास तयार होत नाहीत, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित नियमांमध्ये संबंधितांशी चर्चा विनिमय करुन सुयोग्य बदल करण्याची योग्य ती कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपरोक्त धोरणानुसार महापालिकेमार्फत प्रकल्पबाधितांना मोबदला देण्यात येतो. तथापि, सद्य:स्थितीत प्रकल्पबाधितांना २०० टक्के भरपाई देण्याबाबत कोणतेही धोरण नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी शहर व परिसरात रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२४) * १५६२१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहर व परिसरात मोठ्या प्रमाणावर पॉवरलूम व्यवसाय असून लॉजिस्टिक व्यवसायही कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे विशेषत: जेएनपीटीहून अहमदाबाद महामार्गाने जाणारी वाहने आणि भिवंडी तालुक्यातील गोदामांमध्ये जाणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी गायमुख ते खारेगावपर्यंत कोस्टल रोडचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याकरीता भिवंडी शहर व तालुक्यातील रस्त्यांसाठी विशेष निधी मंजूर करण्याबाबत तसेच गायमुख ते खारेगावपर्यंत कोस्टल रोडचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) होय खरे आहे.
बाळकुम (खारेगाव) ते गायमुख या ठाणे खाडी किनारा मार्गाच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक १६/११/२०२१ रोजीच्या १५१ व्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत रुपये १३१६.१८ कोटी इतकी आहे. ठाणे खाडी किनारा मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर सदर मार्ग भिवंडी शहरातून अहमदाबादकडे जाण्याकरीता सोईचा राहणार असल्याने सदर मार्गाच्या वापरामुळे भिवंडी शहर व परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामनेर (जि.जळगाव) नगरपरिषद हद्दीतील भूखंडावर अनधिकृत बांधकाम करुन शासकीय निधीचा गैरवापर करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(२५) * १६१६४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) नगरपरिषद हद्दीतील भूखंडावर अनधिकृत बांधकाम करुन रुपये २५ कोटी शासकीय निधीचा गैरवापर झाल्याबाबतची तक्रार श्री.पारस ललवाणी यांनी दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी तत्कालीन मा.नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय निधीचा गैरवापर करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशी तक्रार विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जय वकील स्कूल, शिवडी, मुंबई येथील कार्यरत महिला कर्मचाऱ्यास सेवासातत्य देण्याबाबत

**(२६) * १५३८९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जय वकील स्कूल, शिवडी, मुंबई येथे श्रीमती कविता हरेश चिले या २० वर्षापासून कार्यरत असून त्यांना सेवासातत्य देण्याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २७ जून, २०१८ रोजी आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून रुपये २५०००/- दंड आकारावा असे आदेश दिले आहेत, त्यानुसार संबंधित दोषी अधिकाऱ्यांकडून दंड आकारण्यात आला आहे काय, तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने श्रीमती कविता चिले यांच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असणाऱ्या दोषीवर कारवाई करुन अशा प्रकारच्या अन्य प्रकरणांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७ जून २०१८ रोजी दिलेले आदेश हे सेवासातत्य बाबतचे नसून ते थकीत वेतन अदा करण्याबाबतचे आहेत.
(२) मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे थकीत वेतन अदा करण्याची कार्यवाही मुदतीत करण्यात आली असल्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्याकडून दंड आकारण्याचा प्रश्न येत नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्यात" राबविण्यात आलेल्या मोहिमेत नागरिकांची कामे प्रलंबित राहिल्याबाबत

**(२७) * १५०९६ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने मा.पंतप्रधान यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून "राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा" राबविण्यात आला होता, सदरहू पंधरवडा मोहिमेत सर्वसामान्य नागरिकांची फक्त २० टक्के कामे मार्गी लागली आहेत, तर उर्वरित ८० टक्के कामे अद्याप प्रलंबित आहेत, तसेच रखडलेल्या कामांमध्ये विविध प्रकारच्या परवान्यांपासून दाखल्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नागरिकांची कामे मार्गी लागावी म्हणून शासनाने राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवड्याला दिनांक ५ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत एक महिना मुदतवाढ दिली असून सेवा वेळेत उपलब्ध होण्याच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता असलेले राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पद गत ८ महिन्यांपासून रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पद भरण्याबाबत तसेच नागरिकांची प्रलंबित कामे मार्गी लावण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे. दिनांक १७ सप्टेंबर, २०२२ ते दिनांक ०२ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीमध्ये राज्य शासनाद्वारे राज्यामध्ये सेवा पंधरवडा राबवण्यात आला. सदर सेवा पंधरवड्यात नागरिकांची २०% पेक्षा अधिक कामे निकाली निघाली आहेत. त्यामुळे नागरिकांची ८०% अद्याप कामे प्रलंबित राहिली हे विधान खरे नाही.
(२) हे खरे आहे. सदर सेवा पंधरवड्याची मुदत दिनांक ०५ नोव्हेंबर,२०२२ पर्यंत वाढविण्यात आली होती. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पद माहे जानेवारी, २०२२ मध्ये रिक्त झाले आहे.
(३) राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त पदावर नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावर कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव (जि.सातारा) शहरासाठी मंजूर झालेला निधी अन्य कामांकडे वळविल्याबाबत

**(२८) * १६२३९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरेगांव (जि.सातारा) शहरासाठी तत्कालीन शासनाने सन २०२१-२२ साठी रुपये पाच कोटींचा मंजूर केलेला विकास निधी नगरपंचायतीच्या खात्यावर जमा झाला असूनही प्रशासनाने सदरहू निधी अन्य कामांकडे वळवून लोकहिताची कामे रद्द केली असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने रुपये पाच कोटींचा निधी शहरासाठी मंजूर केला असताना दरम्यानच्या काळात नगरपंचायत निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यामुळे कामे होऊ शकली नाहीत, त्यामुळे मंजूर झालेली विकासकामे न करता सदर निधी नगरपंचायतीच्या खात्यात वर्ग करण्यात आला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर झालेला निधी रद्द करता येत नसल्यामुळे सदर निधी अन्य कामांकडे वळविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) कोरेगांव नगरपंचायतीस सन २०२१-२२ करीता शासन निर्णय दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२१ अन्वये रुपये ४.१९ कोटी निधीची कामे "विशेष रस्ता अनुदान" योजनेंतर्गत तर रुपये ०.८१ कोटीची कामे "वैशिष्ट्यपूर्ण" योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेली आहेत.

शासन शुध्दीपत्रक दिनांक २० मे, २०२२ तसेच शासन शुध्दीपत्रक दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ अन्वये कार्यारंभ आदेश दिला नसल्याच्या अटीच्या अधीन राहून जुनी कामे रद्द करुन नवीन कामांना मान्यता देण्यात आली आहे.

सदर निधी नगरपंचायत खात्यात वळविण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गतच्या गृहपाल पदावरील महिला कर्मचाऱ्यांना पदोन्नतीतून डावलण्यात आल्याबाबत

**(२९) * १५५०१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत गृहपाल, कार्यालयीन अधीक्षक व वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक ही तीनही पदे समकक्ष असून कार्यालयीन अधीक्षक पदाकरीता १०० टक्के पदोन्नती, वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक पदाकरीता ७५ टक्के पदोन्नती व गृहपाल पदाकरीता २५ टक्के पदोन्नती लागू आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व गृहपाल मागासवर्गीय महिला असून गृहपाल पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना पदोन्नतीतून डावलण्यात आल्याने गृहपालांवर अन्याय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याप्रकरणी निर्णय घेऊन सर्व गृहपाल मागासवर्गीय महिला कर्मचाऱ्यांना पदोन्नती लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात खाजगी बस चालकांकडून वाहतूक नियमांची अंमलबजावणी होत नसल्याबाबत

**(३०) * १६१८६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खाजगी प्रवास बस वाहतूकदारांविरुध्द परिवहन विभागाने राबविलेल्या तपासणी मोहिमेत २९०२ खाजगी बस वाहतूकदारांनी वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात विशेषत: नाशिक व यवतमाळ जिल्ह्यातील खाजगी प्रवासी बस वाहतूकदारांनी शासनाच्या निकषाप्रमाणे अग्निशमन यंत्रणेची पुर्तता केली नसल्यामुळे बसला आग लागून जीवितहानी झाल्याचे तसेच परिवहन विभागाने केलेल्या तपासणीमध्ये ११३७ खाजगी बसमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी बस वाहतूकदारांवर तसेच राज्यातील खाजगी बसेसची तपासणी करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना परिवहन आयुक्त कार्यालयाद्वारे दिनांक १०/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ०९/१०/२०२२ ते दिनांक २३/१०/२०२२ या कालावधीत खाजगी बसेस तपासणीचे निर्देश देण्यात आलेले होते. सदर तपासणी मोहीमेमध्ये राज्यातील एकूण ३८८५ दोषी वाहनांकडून रुपये ९९ लाख इतकी दंड वसूली करण्यात आली.
(२) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकांमार्फत केलेल्या तपासणीमध्ये राज्यातील एकूण १३६६ खाजगी बसमध्ये अग्निशमन यंत्रणा कार्यरत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या दोषी वाहनांवर महाराष्ट्र मोटार वाहन नियम १८८ नुसार प्रतिवेदीत करण्यात आले आहे.
(३) सर्व प्रादेशिक व उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकांमार्फत वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या खाजगी बसेसवर कारवाई करण्यात आलेली आहे, त्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन मंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करण्याबाबत

**(३१) * १६३३९ श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक १०३०६ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करण्याबाबतच्या मागणीकरीता राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी माहे ऑक्टोबर, २०२१ ते मार्च, २०२२ या सहा महिन्यांच्या कालावधीत संप पुकारण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत करुन समितीचे कामकाज १२ आठवड्यात पूर्ण करून त्याचा अहवाल मा.मुख्यमंत्री यांना सादर करावा व मा.मुख्यमंत्री यांनी त्यांचे मत/शिफारशीसह मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना सादर करावे, असे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्रिसदस्य समितीने उक्त प्रकरणी अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदर अहवालाच्या शिफारशी काय आहेत, त्यानुषंगाने शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन मंडळाचे राज्य शासनात विलीनीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.
(३) व (४) समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

१. रस्ते परिवहन महामंडळ अधिनियम १९५० अन्वये लागू असलेल्या कायदेशीर तरतूदी आणि इतर लागू कायदे, नियम तसेच प्रशासकीय आणि कार्यात्मक बाबींचा विचार करता, महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना राज्य शासनात सामावून घेणे शक्य नाही.
२. त्याप्रमाणे कायदेशीर तरतूदी तसेच प्रशासकीय व कार्यात्मक बाबींचा विचार करता महामंडळाचे कर्मचाऱ्यांसह राज्य शासनामध्ये विलीनीकरण करणे आणि महामंडळाच्या अपेक्षेप्रमाणे प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय शासकीय विभागामार्फत करणे शक्य होणार नाही.
३. महामंडळाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, राज्य शासनाने अर्थसंकल्पीय तरतूद करुन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी किमान पुढील ४ वर्षासाठी निधी उलब्ध करुन देण्यात यावा. महामंडळाच्या आर्थिक कामगिरीचा आढावा घेऊन हे आर्थिक सहाय्य पुढे सुरु ठेवण्याबाबत योग्य वेळी निर्णय घेण्यात यावा.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गतच्या रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत

**(३२) * १६४५१ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत एका किलोमीटर लांबीच्या रस्त्यांसाठी साडे चौदा कोटी रुपये महानगरपालिकेमार्फत खर्च करण्यात येणार असून चारशे किलोमीटर लांबीच्या सिमेंट क्रॉंक्रिट रस्त्यांसाठी महानगरपालिका रुपये सहा हजार कोटी खर्च करणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील सदरहू रस्त्यांसाठी एवढा खर्च येऊ शकत नसल्याची तक्रार "रोड मार्च आणि पोटहॉल्स वॉरियर्स" या संस्थाने केली असून सदर निकृष्ट दर्जाचा रस्त्यांची जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते व वाहतूक विभागामार्फत मुंबईतील ९१० रस्त्यांच्या सिमेंट क्रॉंक्रिटमध्ये सुधारणा करण्याकरीता माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये निविदा मागविण्यात आल्या.

सदर निविदांमध्ये शहर विभागातील ७१.९१ कि.मी. लांबीच्या २१२ रस्त्यांसाठी रुपये ११९४.०३ कोटी, पूर्व उपनगरातील ७०.४२४ कि.मी. लांबीच्या १८२ रस्त्यांसाठी ८११.६२ कोटी व पश्चिम उपनगरातील २५३.६५ कि.मी. लांबीच्या ५१६ रस्त्यांसाठी रुपये ३८०१.०५ कोटी इतक्या रकमेच्या निविदांचा समावेश आहे. सदर अंदाजित रकमेनुसार प्रति कि.मी. रस्त्याकरीता शहर विभागात सदर निविदा योग्य प्रतिसादाअभावी रद्द करण्यात आल्या.

तद्नंतर चालू बाजार भावानुसार बाबदर सूची तयार करुन माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये शहर विभागात रुपये १२३३ कोटी, पूर्व उपनगरात रुपये ८४६.१७ कोटी व पश्चिम उपनगरात रुपये ४०००.२१ कोटी इतक्या रकमेच्या पुन्हा नव्याने ई-निविदा मागविण्यात आल्या. या निविदांनुसार शहर विभागात रुपये १७.१५ कोटी, पूर्व उपनगरात रुपये १२.०१ कोटी व पश्चिम उपनगरात रुपये १५.०७ कोटी असा सरासरी प्रति कि.मी. खर्च येत आहे. सदर खर्च जी.एस.टी. वगळून आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) उपलब्ध अभिलेखानुसार "रोड मार्च" आणि "पोटहोल वॉरियर्स" यांचेकडून तक्रार प्राप्त झालेली नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

-----------------

## पेंढरी (ता.धानोरा, जि.गडचिरोली) परिसर आदिवासी बहुल भागात राज्य परिवहन महामंडळाच्या बस फेऱ्या सुरु करण्याबाबत

**(३३) * १६५१७ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेंढरी (ता.धानोरा, जि.गडचिरोली) परिसर आदिवासी बहुल भाग असून दोरगट्टा, दुर्गापूर, झाडापापडा, बोटेहुर या गावांमध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या बस फेऱ्या सुरु नसल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांमध्ये बस फेऱ्या नसल्यामुळे शालेय विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पेढरी परिसर आदिवासी भागात राज्य परिवहन महामंडळाच्या बस फेऱ्या सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली होती.

(२), (३) व (४) सदर मार्गावर बससेवा सुरू करणेबाबत कुठलेही निवेदन वा मागणी नाही. विद्यार्थी पासेसची संख्या सुध्दा या मार्गावर नाही. तथापि, वर्तमानपत्रातील बातमी लक्षात घेऊन दिनांक १४/१२/२०२२ पासून गडचिरोली ते पाखांजूर मार्गे दोरगट्टा, दुर्गापूर, झाडापापडा, बोटेहुर अशा २ बसफेऱ्या सुरू करण्यात आल्या आहेत.

-----------------

## सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करण्याबाबत

**(३४) * १६७३८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाने कृषी निर्यात कार्यक्रमांतर्गत क्लस्टर (AEP - Agriculture Export Program) मध्ये सांगली जिल्ह्याची निवड केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, सांगली यांनी सांगली आणि नजीकच्या भागातून कृषी निर्यात सुलभ होण्यासाठी सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करण्याकरीता आयुक्त कस्टम यांच्याशी पत्रव्यवहार केला असून सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करण्याबाबत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत चर्चा झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलांबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) केंद्रीय शिपींग मंत्रालयाने सांगली जिल्ह्यात ड्रायपोर्ट स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.
(२) व (३) सांगली जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक १४/१०/२०२२ रोजीच्या बैठकीच्या इतिवृत्तावरुन सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करणेबाबत चर्चा झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करण्यासंदर्भात एप्रिल २०१८ मध्ये महाराष्ट्र शासन व जवाहरलाल नेहरु पोर्ट प्राधिकरण यांच्यात करार झालेला असून, महाराष्ट्र शासनाने ड्रायपोर्ट स्थापन करण्यासाठी भूसंपादन करण्याकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास नोडल एजन्सी म्हणून नेमणूक केलेली आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणात Inland Container Depots असल्यामुळे नवीन Inland Container Depots स्थापन करण्यास परवानगी देता येणार नाही. तसेच Central Board of Indirect Taxes & Customs (CBIC) यांची परवानगी मिळेपर्यंत सांगली येथे ड्रायपोर्ट स्थापन करण्याची प्रक्रिया थांबविण्यात आली आहे असे जवाहरलाल नेहरु पोर्ट प्राधिकरण यांच्या दिनांक १६/०८/२०२२ च्या पत्रान्वये प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली यांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## अभिनव नगर बोरीवली (पूर्व), मुंबई येथे केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्गदर्शन केंद्र उभारण्याबाबत

**(३५) * १६८४३ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील मागाठाणे आणि विधानसभा क्षेत्रातील अभिनव नगर, बोरीवली (पूर्व) मुंबई येथे केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्गदर्शन केंद्रासाठी जागा देण्यासाठी तत्कालीन

मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ८ जुलै, २०१९ रोजीच्या पत्राद्वारे लोकप्रतिनिधींनी मागणी केली असून, त्याप्रमाणे शासनाने दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका मुंबई यांना नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देऊनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील अभिनंदन बोरीवली (पूर्व) मुंबई येथे केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्गदर्शन केंद्र उभारण्यासाठी दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर कारवाई करुन केंद्रीय लोकसेवा आयोग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्गदर्शन केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील अभिनव नगर, बोरीवली (पूर्व) येथील नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्राच्या अखत्यारीतील जागा "महानगरपालिकेच्या प्रशिक्षण केंद्राकरीता" विकास नियोजन आराखडा २०३४ मध्ये राखीव असल्याने, सदर जागेत बाह्य वर्गाच्या प्रशिक्षणामुळे महानगरपालिका कर्मचारेतर व्यक्ती व आगंतुकांची वर्दळ वाढवून मालमत्तेच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने नवीन आव्हाने तयार होतील व त्यामुळे सदर प्रस्तावास मान्यता देणे उचित होणार नाही, असे संबंधित लोकप्रतिनिधींना दिनांक ०२/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांमधून होत असलेली पाणीचोरी आणि गळती रोखण्याबाबत

**(३६) * १५२१५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहर व उपनगरात घरोघरी पाणीपुरवठा करणाऱ्या अंतर्गत जलवाहिन्या जीर्ण झाल्यामुळे त्यातून होणाऱ्या गळतीच्या माध्यमातून दररोज १७० दशलक्ष लिटर पेक्षा जास्त पाणी वाया जात असल्याचे तसेच मुंबई शहर आणि उपनगरातील विशेषत: मालाड, मालवणी, कुर्ला, धारावी, गोवंडी, मानखुर्दसह झोपडपट्टी वसलेल्या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांमधून पाणीचोरी करुन पाण्याचा काळाबाजार होत असल्याचे दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या गळक्या जलवाहिन्यांमुळे देखील मुंबईतील लाखो लिटर पाणी वाया जात असल्यामुळे मुंबईकरांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे, सदरहू अंतर्गत जलवाहिन्या सुधारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता रुपये ५६१ कोटींची तरतूद केली होती, मात्र त्यापैकी ५० टक्के पेक्षा कमी निधी देखील खर्च करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बोरीवली (प.) येथील गोराई खाडी पलीकडील परिसरातील गोराई गाव, खालचा व वरचा कोळीवाडा, भंडारवाडा, चर्च गल्ली, मुरदान पहाडी, खजुरी वाडी, कुलवेम, शेफाली, उत्तन गोराई रोड आणि इतर अनेक भागात गेल्या एक ते दीड महिन्यांपासून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून होत असलेला पाणीपुरवठा बंद असल्याने येथील नागरिकांना पाणी टंचाईचा सामाना करावा लागत असला तरी या परिसरातील हॉटेल, रिसॉर्ट आणि लॉजिंग-बोर्डिंग यांना मात्र मुबलक प्रमाणात पाणी मिळत असल्याचे निदर्शनास आले असून यांपैकी बहुतांश हॉटेल व्यावसायिकांनी अनधिकृत जलजोडण्या घेतलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांमधून होत असलेली पाणीचोरी आणि गळती रोखण्याबाबत तसेच मुंबईतील जीर्ण झालेल्या जलवाहिन्या बदलण्यासाठी निधी उपलब्ध करुन मुंबईकरांना स्वच्छ व सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई शहर व उपनगरामध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या काही जुन्या जलवाहिन्या जीर्ण झाल्यामुळे तेथे पाणी गळती होत असते. पाणी गळती आढळल्यास / तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ दुरुस्ती करण्यात येते व आवश्यकता भासल्यास अशा जलवाहिन्या बदलण्याची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येतात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्यांमधून पाणी चोरी करुन पाण्याचा काळाबाजार होत असल्याचे आढळून आल्यास तसेच अनधिकृत जलजोडणी आढळल्यास/ तक्रार प्राप्त झाल्यास त्यानुषंगाने तात्काळ कार्यवाही करुन अनधिकृत जलजोडण्या खंडीत करण्यात येतात. तसेच सदर परिसर निरीक्षणाखाली ठेवण्यात येतो.

अनधिकृत जलजोडणी, पाणीचोरी व पाण्याचा काळा बाजार यास आळा घालण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेने "सर्वांसाठी पाणी" हे धोरण अंमलात आणले आहे. याअंतर्गत निवासी जागांसाठी मागणीनुसार जलजोडण्या देण्यात येत आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जलवाहिन्या सुधारण्यासाठी महानगरपालिकेने सन २०२१-२२ वर्षांकरीता रुपये ३५१.३७ कोटींची तरतूद केली होती. त्यापैकी रुपये ३२३.२२ कोटी (९२ टक्के) खर्च करण्यात आले आहेत.

(३) बोरीवली (प.) येथील गोराई भाग हा गोराई खाडीपलीकडे असून तेथील गावांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत लिबर्टी गार्डन टनेल-मालाड-मार्वे मार्गे पाणीपुरवठा केला जातो. मार्वे जेट्टीहून खाडीमधून जलवाहिनी टाकण्यात आली आहे. खाडीपलीकडे मनोरी गावामार्गे टनेलपासून अंदाजे १२ कि.मी. अंतराहून सदर पाणीपुरवठा केला जात आहे. हे अंतर जास्त असल्यामुळे एअर टॅप झाल्यास गोराई गावातील काही भागाला कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त होतात. सदर पाणीपुरवठा सुधारण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सातत्याने एअर ब्लो करणे व गळती थांबवणे यासारखी कामे करुन पाणीपुरवठा सुरळीत राखण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

गोराई विभागातील पाणी समस्या सुधारण्याकरीता महानगरपालिकेमार्फत खालील कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत :-

- गोराई गाव बोरीवली (प.) येथील मार्केटला लागून असलेल्या जागेत शोषण टाकी व उंदचन केंद्र बांधून जलवाहिन्या टाकण्याचे काम प्रस्तावित आहे. तथापि, सदर जागा ही कांदळवन क्षेत्रात येते. त्यामुळे सदर जागेत शोषण टाकीचे बांधकाम करण्याची परवानगी मिळण्याकरीता मा.उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्रमांक ४१३८/२०२२ दाखल करण्यात आली आहे. सदर परवानगी प्राप्त झाल्यानंतर शोषण टाकीच्या बांधकामाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.
- बोरीवली (प.) येथून खाडीमार्गे स्वतंत्र जलवाहिनी टाकून बोरीवली येथील महावीर नगर टनेल मधून पाणीपुरवठा करता येईल किंवा कसे याबाबतची पडताळणी महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/मध्य विभागामार्फत गोराई गाव परिसरातील हॉटेल, रिसॉर्ट आणि लॉजिंग-बोर्डिंगला असलेल्या जलजोडणीची पहाणी करुन अनधिकृत जलजोडण्या आढळल्यास त्यावर वेळोवेळी कारवाई करण्यात येते. दिनांक ०६/१०/२०२२ रोजी गोराई गाव येथे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या पाहणीमध्ये ३ अनधिकृत जलजोडण्या आढळून आल्या. या अनधिकृत जलजोडण्या खंडीत करण्यात आल्या असून सदर परिसर निरीक्षणाखाली ठेवण्यात आला आहे.

(४) मुंबई शहर व उपनगरमध्ये पाणीपुरवठा करणाऱ्या जुन्या जलवाहिन्या जीर्ण झाल्या असल्यास किंवा सतत गळती होत असल्यास सदर जलवाहिन्या दुरुस्ती किंवा बदलण्याची कामे आवश्यकतेनुसार महानगरपालिकेमार्फत नियमितपणे करण्यात येतात. तसेच, गळतीबाबत तक्रार प्राप्त होताच त्या ठिकाणी दुरुस्ती करुन गळती थांबवली जाते. जलवाहिनी बदलण्याकरीता दरवर्षी आवश्यकतेनुसार निधीची तरतूद करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कन्नमवार नगर, विक्रोळी (मुंबई) येथील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत

**(३७) * १५४६७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्नमवार नगर, विक्रोळी (मुंबई) येथील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय, टागोर नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रसूतीगृहात सन २०१७ पासून तात्पुरत्या स्वरुपात हलविण्यात आले असल्याने या भागातील रुग्णांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ५ वर्षानंतरही कन्नमवार नगर येथील या रुग्णालयाची पायाभरणी न झाल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून सदर रुग्णालयाचे काम सुरु होण्याकरीता येथील नागरिकांनी दोन वर्षापासून महानगरपालिकेकडे सातत्याने पाठपुरावा करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यासंदर्भात निर्णय घेवून व निधीची तरतूद करुन सदरील रुग्णालय कन्नमवार येथे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कन्नमवार नगर, विक्रोळी (मुंबई) येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाची इमारत धोकादायक असल्याने सदर रुग्णालय सन २०१८ मध्ये टागोर नगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रसूतीगृहात स्थलांतरीत करण्यात आले. सदर प्रसूतीगृहामध्ये क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयातील आंतररुग्ण विभाग, अपघात विभाग, शस्त्रक्रियागार विभाग, क्ष-किरण विभाग, अतिदक्षता विभाग, प्रयोगशाळा विभाग इ. सुरु आहेत.

सद्य:स्थितीत, क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग हा कन्नमवार नगर येथे पोर्टा केबीनमध्ये कार्यरत आहे.

(२) व (३) कन्नमवार नगर, विक्रोळी (मुंबई) येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाची इमारत यापूर्वी वारंवार दुरुस्त करण्यात आली होती. त्यामुळे सदर इमारत पुन्हा दुरुस्त करण्याऐवजी त्याजागी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय महानगरपालिकेमार्फत घेण्यात आला.

मंजूर विकास आराखडा २०३४ नुसार, न.भू.क्र. ३५६ मौजे हरियाली हा अंदाजे ९७९० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड, रुग्णालय व महानगरपालिका कर्मचारी वसाहत याकरीता आरक्षित आहे. सदर भूखंड महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. या भूखंडापैकी ६२१५.२७ चौ.मी. भूखंड म्हाडाने महानगरपालिकेला हस्तांतरीत केला असून उर्वरित ३५७४.७३ चौ.मी. भूखंड अद्यापपर्यंत हस्तांतरीत झालेला नाही.

सन २०१९ मध्ये प्रस्तावित रुग्णालयाचे आराखडे म्हाडा प्राधिकरणाकडे मान्यतेकरीता पाठविण्यात आले होते. परंतु, उपरोक्त ३५७४.७३ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत झाला नसल्याने म्हाडामार्फत सदर आराखड्यास मान्यता देण्यात आली नाही.

तद्नंतर दिनांक १५/०९/२०२२ रोजी आयोजित बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांनी, कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व) येथील क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाचा पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक ते सर्व चटईक्षेत्र वापरुन तेथे ५०० रुग्णशैय्या असलेले स्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे बांधकाम करण्याची कार्यवाही सुरु करावी, याबाबत म्हाडाने जमीन तत्काळ विनामोबदला हस्तांतरीत करुन पुनर्विकासाच्या प्रस्तावास मान्यता / ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करावी असे निदेश दिले आहेत.

त्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत ५०० रुग्णशैय्या असलेल्या रुग्णालयाचे आराखडे म्हाडा प्राधिकरणाकडे दिनांक २८/१०/२०२२ रोजी मान्यतेकरीता पाठविण्यात आले. त्यानुषंगाने म्हाडा प्राधिकरणाने दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, अधिमुल्याची निश्चित केलेली रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून म्हाडाकडे जमा करण्याच्या अटीवर व म्हाडाच्या भूखंड वितरणाच्या प्रचलित अटी व शर्तीच्या अधीन राहून भूखंडाचा आगाऊ ताबा देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले आहे. त्यानुषंगाने ३५७४.७३ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड ताब्यात घेण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

तसेच दिनांक १५/०९/२०२२ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या निदेशानुसार, सदर भूखंड म्हाडाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस विनामोबदला हस्तांतरीत करण्याबाबत तसेच रुग्णालयाच्या आराखड्यास मंजूरी देण्याबाबत दिनांक ०५/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने म्हाडा प्राधिकरणास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषदेंतर्गत धनादेश प्रकरणी माहिती देण्यास विलंब होत असल्याबाबत

**(३८) * १५१८८ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद नगरपरिषदेतील मुख्याधिकारी पदावर रुजू झाल्यापासून गैरकारभार वाढले असून व मुख्याधिकारी यांनी दिलेले धनादेश न वठता परत आले असल्याकारणाने उस्मानाबाद नगरपरिषदेची बँकेतील पत कमी झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकेतील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद यांना सूचना देऊनही संबंधित मुख्याधिकारी यांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तसेच ठेकेदारांचे आर्थिक हितसबंध असल्याकारणाने नगरपरिषदेमध्ये पैसे नसतानाही धनादेश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना सदरील धनादेश न वठणे प्रकरणी माहिती मिळण्यासाठी एकूण ६ पत्रे देऊनही माहिती मिळाली नाही, तसेच दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी उस्मानाबाद नगरपरिषदेमधील महाराष्ट्र नगरपरिषद कलम ३०६ अन्वये रेकॉर्ड जप्त करण्यासाठी मागणी केलेली असूनही याबाबतही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहिती न देणे ही बाब भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम १७६ चे उल्लंघन असूनही सदरील माहिती जाणीवपूर्वक, हेतूपुरस्सर व केलेला गैरव्यवहार दडपणाच्या हेतूने माहिती देण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू माहिती देण्यास विलंब करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी मागणी केलेली माहिती, मुख्याधिकारी, नगरपरिषद उस्मानाबाद यांनी दिनांक १४/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सादर केली आहे. सदर माहिती जिल्हाधिकारी, उस्मानबाद यांनी त्यांच्या दिनांक २४/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.लोकप्रतिनिधी यांना दिली आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या पत्रानुसार रेकॉर्ड जप्त करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडून पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील शासकीय कार्यालयात कर्मचाऱ्यांकरीता बायोमॅट्रीक पध्दत लागू करणेबाबत

**(३९) * १५९७६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात शासनाने पाच दिवसांचा आठवडा तसेच सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी कार्यालयीन वेळ निश्चित केली असून सदर कार्यालये नियमाप्रमाणे सुरु होत आहेत, याबाबत कोणतीही सक्षम यंत्रणा प्रशासनाकडे नसल्याने कर्मचारी विहित वेळेत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यालयीन वेळेत अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहत नसल्याने नागरिकांची गैरसोय होत असून कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीकरीता पूर्वीप्रमाणेच बायोमॅट्रीक पध्दत लागू करण्याची मागणी परभणीतील स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील उपस्थितीकरीता बायोमॅट्रीक पध्दत लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, परभणी कार्यालयाच्या अधीनस्थ असलेल्या सर्व विभागांत/ कार्यालयांत आधार आधारित बायोमेट्रिक उपस्थिती नोंदणी पध्दत दिनांक ३/८/२०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये लागू करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत परभणी जिल्ह्यातील कार्यालयात बायोमेट्रिक प्रणालीचा वापर सुरू आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यातील निराधार, अपंग, वृध्द कलावंत, निराधार महिला इत्यादींना हयात असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती होत असल्याबाबत

**(४०) * १५२७७ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील निराधार, अपंग, वृध्द कलावंत, विधवा, परितक्त्या, घटस्फोटीत निराधार महिला, वृध्दांसाठी श्रावणबाळ अशा विविध कल्याणकारी योजना राबवून त्याद्वारे गरजूंना आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी निराधार, अपंग व वृध्दांना व लाभार्थ्यांना ते हयात असल्याचा दाखला/पुरावा/प्रमाणपत्र दरवर्षी बँकेत जमा करण्याची मुभा होती, त्याऐवजी आता तहसिलदार कार्यालयात जाऊन हयातीचे पुरावे सादर करणेची अट घालण्यात आली असून हयात असल्याचे पुरावे सादर न केल्यास योजनेचा लाभ मिळणे बंद करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले, सदर प्रमाणपत्रे/पुरावे दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत सादर करणे बंधनकारक करण्यात आले असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठ नागरिक, अपंग व्यक्ती, वृध्द कलावंत यांना त्यासाठी तहसिलदार कार्यालयात जावे लागत असल्याने पुर्वीप्रमाणेच बँकांमध्ये हयातीचे प्रमाणपत्र सादर करण्याचे आदेश संबंधितांना देण्यात यावेत, अशी मागणी लाभधारकांनी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) विशेष सहाय्य योजनेच्या दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार दरवर्षी लाभार्थ्यांनी त्यांचे जेथे खाते आहे अशा बँक मॅनेजरकडे अथवा पोस्ट मास्तरकडे स्वत: हजर राहावे व ते हयात असल्याची नोंद बॅक मॅनेजर/पोस्ट मास्तर यांनी घ्यावयाची आहे.

कोणत्याही कारणामुळे लाभार्थी बँकेत हजर राहू शकला नाही तर त्या लाभार्थ्यांने नायब तहसिलदार/तहसिलदार/उपविभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी) यांचे समोर हजर राहून हयातीबाबतचे प्रमाणपत्र संबंधित तहसिलदाराकडे सादर करावे, अशीही दिनांक २० ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन निर्णयात तरतूद आहे.

तसेच दिनांक ०३ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार वरीलप्रमाणे हयात प्रमाणपत्र दिनांक १ एप्रिल ते ३० जून या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे महानगरपालिकेच्या लेखा विभाग व मुख्य लेखापाल यांनी निधीचा अपहार केल्याबाबत

**(४१) * १५१४० श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या लेखा विभागातील ताळेबंद अभिलेख व आर्थिक व्यवहाराबाबत सन २०१६-१७ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षण करण्यात आले होते, सदर लेखा परीक्षणामध्ये अनेक त्रुटी आढळून आल्याची माहिती शासनाने महानगरपालिकेस कळविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लेखा परीक्षणात बँक खात्यामध्ये रक्कम शिल्लक असताना महानगरपालिकेची बँक खाते बंद करणे, महापालिकेतील सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील विविध योजनांच्या बँक खात्यातील दिनांक ३१ मार्च, २०१७ अखेरची शिल्लक रक्कम आणि कॅश बुक मधील अखेरच्या शिल्लक रकमेत तफावत असणे, महानगरपालिकेचे लेखे व नोंदणी न ठेवणे, महानगरपालिकेच्या लेखा विभागाद्वारे गुंतवणूक करण्यात आलेल्या रकमेची नोंदवही ठेवण्यात आलेली नसणे, नोंदीमध्ये नमूद प्रमाणकामधील रक्कम व ठेकेदारास प्रत्यक्षात प्रदान केलेल्या रकमा यामध्ये व नावात तफावत असणे अशा अनेक नियमबाह्य बाबी पुणे महानगरपालिकेच्या लेखा विभागाकडून व मुख्य लेखापाल यांच्याकडून करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेकडून विशेषतः लेखा विभागाकडून सदर त्रुटी व दोष दूर करण्याबाबत व महापालिकेचे झालेले आर्थिक नुकसानीबाबत जबाबदारी निश्चित करुनही दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नसल्याचे व नुकसानाची रक्कम वसुल करण्यात आली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या निधीचा अपहार, आर्थिक गैरव्यवहार व नियमबाह्य पध्दतीने कामे करुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सन २०१६-१७ सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे स्थानिक निधी लेखा परिक्षण दिनांक ०६/०१/२०२१ ते दिनांक ३०/१०/२०२१ या कालावधीमध्ये स्थानिक लेखा निधी कार्यालय यांच्याकडून करण्यात आले असून त्यामध्ये एकूण १२ परिच्छेद मुख्य लेखा व वित्त विभाग, पुणे महानगरपालिका यांना प्राप्त झालेले आहे.

या १२ परिच्छेदात उपस्थित मुद्यांबाबतचा अनुपालन अहवाल संबंधित स्थानिक लेखा परिक्षण पथकाला महानगरपालिकेमार्फत देण्यात आला. तथापि, त्याबाबतचा सन २०१६-१७, २०१७-१८ कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल तपासून अंतिमीकरण स्थानिक लेखा निधीकडून प्राप्त झालेले नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(२) सन २०१६-१७ व २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये पुणे महानगरपालिकेच्या विविध योजनांच्या बँक खाते व कॅश बुक यांचा ताळमेळ घेऊन ज्या बँक खात्यामध्ये शिल्लक रक्कम नाही व चालू नसलेली खाती बंद करण्याबाबत स्थानिक निधी लेखा परिक्षक यांनी दिलेल्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेकडील बँक खाती प्रशासकीय मान्यता घेऊन बंद करण्यात आलेली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या गुंतवणूकीबाबतच्या सर्व नोंदी लेख्यांमध्ये ठेवण्यात येतात.

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडून विविध विकास कामांची बिले ज्या नावाने व रकमेने मुख्य लेखा व वित्त विभागाकडे सादर केली जातात, त्याच नावाने कोष विभागामार्फत पुणे महानगरपालिकेच्या बँक खात्याकडून रकमा आदा करण्यात आलेल्या आहेत. ज्या बिलांची नावे व त्यांना अदा झालेल्या रकमा योग्य असल्याबाबतची माहिती लेखापरिक्षणाच्या वेळी महानगरपालिकेने उपलब्ध करून दिले असल्याचे कळविलेले आहे.
(३) व (४) सन २०१६-१७, २०१७-१८ कालावधीतील लेखा परिक्षण अहवाल तपासून अंतिमीकरण स्थानिक लेखा निधी कार्यालयाकडून प्राप्त झालेले नसल्याने याप्रकरणी जबाबदारी निश्चिती इ. बाबींचा प्रश्न उद्भवत नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरातील महानगरपालिकेच्या कार्यरत मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळांना घरगुती दराने कर आकारण्याबाबत

**(४२) * १६१५९ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळांना घरगुती दराने कर आकारण्याबाबतचे आदेश औरंगाबाद विभाग शिक्षक प्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेसोबत आयोजित केलेल्या बैठकीत मा.मुख्यमंत्री यांनी तत्कालीन आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांना दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळांना घरगुती दराने कर आकारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा स्वरुपाची चर्चा झाली, असे महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) औरंगाबाद शहरातील महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत मराठी व उर्दू माध्यमांच्या अनुदानित शाळांना निवासी दराने सन २०१४ पासून कर आकारण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हिंदमाता (मुंबई) येथे पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(४३) * १५८५० श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदमाता (मुंबई) येथे पावसाळ्यात पाण्याचा निचरा व्हावा यासाठी आतापर्यंत रुपये १०० कोटींपेक्षा जास्त निधी खर्च करुनही भूमिगत पाणी साठवण टाकी ४०% रिकामीच राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यात पाण्याची टाकी ४०% रिकामी राहत असल्याने एक ते दीड फूट पाणी तुंबते त्यामुळे आणखी रुपये पंधरा कोटी खर्च करुन पर्जन्य जलवाहिन्या टाकण्यात येणार असल्याने प्रकल्पाच्या खर्चात अधिकच वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पाचा खर्च न वाढवता पूर्वीच्या आराखड्याप्रमाणे पर्जन्य जलवाहिनीचा खर्च करण्यात येणार काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंदमाता (मुंबई) येथे पावसाळ्यात पाण्याचा निचरा होण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हिंदमाता परिसर, परेल येथे पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या पूरसदृष्य परिस्थितीवर मात करण्यासाठी सेंट झेवियर्स मैदान, परेल येथे २.८७ कोटी लिटर इतक्या क्षमतेची आणि प्रमोद महाजन कला पार्क, दादर (पश्चिम) प्रमोद महाजन कलापार्क येथे १.६२ कोटी लिटर इतक्या क्षमतेची भूमिगत साठवण टाकी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आली आहे. तसेच प्रमोद महाजन कला पार्क, दादर (पश्चिम) येथे १.९९ कोटी लिटर इतक्या क्षमतेची साठवण टाकी बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

हिंदमाता येथे साचणारे पाणी उदंचन करुन प्रमोद महाजन पार्क येथील साठवण टाकीमध्ये वाहून नेण्यासाठी हिंदमाता येथील उड्डाण पुलाच्या खाली लघु उदंचन केंद्र उभारण्यात आले आहे. यामध्ये जमा होणारे पावसाचे पाणी ३०००m३/hr क्षमतेच्या ७ पंपाद्वारे प्रमोद महाजन कला पार्क येथील भूमिगत टाकीमध्ये जलदगतीने साठविण्यात येते.

तसेच हिंदमाता परिसरात साचणारे पाणी उदंचन करुन सेंट झेवियर्स मैदान येथील भूमिगत साठवण टाकीमध्ये वाहून नेण्यासाठी खाशाबा जाधव मार्गावर एक संप पीट (sump pit) बांधण्यात आला आहे. यामध्ये जमा होणारे पाणी ३०००m३/hr क्षमतेच्या २ पंपाद्वारे उदंचन करुन सेंट झेवियर्स येथील भूमिगत टाकीमध्ये साठविण्यात येते.

परंतु, सदरची व्यवस्था अपुरी पडत असल्याने सेंट झेवियर्स मैदानातील साठवण टाकी दिनांक ३०/०६/२०२२ रोजी अंदाजे ४० टक्के रिकामी होती असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे. तथापि, प्रमोद महाजन कला पार्क येथील साठवण टाकी पूर्ण भरली होती.

(२), (३) व (४) हिंदमाता येथे साचणारे पाणी हिंदमाता उड्डाणपुलाच्या खाली बांधण्यात आलेल्या लघु उदंचन केंद्रामध्ये पोहोचण्यास विलंब होत असल्याचे मागील पावसाळयात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आले. त्यामुळे सेंट झेवियर्स रस्त्यावर आणखी एक संप पीट (sump pit) बांधण्याचे तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर रस्त्यावर हिंदमाता सिनेमा जंक्शन ते मडके बुवा जंक्शनपर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूला पदपथाला लागून पर्जन्य जलवाहिनी बांधून ती सदर लघु उदंचन केंद्रास जोडण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालकेमार्फत नव्याने हाती घेण्यात आले आहे.

हिंदमाता येथे साचणारे पाणी उदंचन करुन सेंट झेविअर्स मैदानातील साठवण टाकीमध्ये वाहून नेण्याकरीता नवीन संप पीट (Sump pit) मध्ये ३०००m३/hr क्षमतेचे २ पंपाची व्यवस्था करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

पूर्वीच्या आराखड्याप्रमाणे करण्यात आलेल्या कंत्राटाचा एकूण खर्च रुपये ११४.५५ कोटी इतका आहे. उपरोक्त नवीन वाढीव कामाचा कंत्राट खर्च रुपये १२.०२ कोटी इतका आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाली आहे. तसेच प्रकल्पाचा खर्च न वाढवता पूर्वीच्या आराखड्याप्रमाणे पर्जन्य जलवाहिनीचा खर्च करण्याबाबत कोणतीही कार्यवाही अथवा उपाययोजना प्रस्ताविण्यात आली नसल्याचे/येणार नसल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील हनुमान कोळीवाड्याचे योग्य पुनर्वसन झाले नसल्याबाबत

**(४४) * १५५६९ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक १२५१४ ला दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) येथील जे.एन.पी.टी. प्रकल्पासाठी शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) गावातील जमिनी संपादित करण्यात आल्या असून सदर गावांचे पुनर्वसन उरणजवळ बोरीपाखाडी येथे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जे.एन.पी.टी. ने शेवा कोळीवाडा (हनुमान कोळीवाडा) गावाचे पुनर्वसन खर्चाच्या हमीची लेखी जबाबदारी शासनाला दिनांक १२ नोव्हेंबर, १९८२ रोजी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गावांचे योग्य पुनर्वसन केले नसल्याचे तसेच सेवा सुविधा पुरविण्याचे आश्वासन जे.एन.पी.टी. प्रशासनाने पूर्ण केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, योग्य पुनर्वसन झाले नसल्यामुळे हनुमान कोळीवाड्यातील ग्रामस्थांनी मूळ गावी राहायला जाण्याबाबतचा ठराव ग्रामसभेत मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हनुमान कोळीवाड्यांचे योग्य पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या केंद्र शासनाच्या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या अनुषंगाने मूळ शेवा गावाचे पुनर्वसन मौजे बोकडवीरा (नवीन शेवा) व कोळीवाडा गावाचे पुनर्वसन मौजे बोरीपाखाडी (हनुमान कोळीवाडा) येथे करण्यात आलेले आहे.
(२) शासन परिपत्रक, दिनांक १८/११/१९८३ अन्वये तत्कालीन मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या कार्यकक्षेमध्ये जे.एन.पी.टी. यांनी पुनर्वसनासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा असे नमूद केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.
(३) मौजे हनुमान कोळीवाडा येथील काही घरांना वाळवीची लागण / प्रादुर्भाव झाल्याचे निदर्शनास आले आहे. सदर गावाचे पुनर्वसन दिनांक ०८/०८/१९८५ चे लेआऊट नुसार १६.८२.३० हे.आर. क्षेत्रावर प्रस्तावित होते. मात्र प्रत्यक्षात २ हे.आर क्षेत्र नागरिकांना घराच्या बांधकामासाठी वाटप करण्यात आले आहे.
(४) हनुमान कोळीवाडा गावातील नागरिकांनी मूळ गावी राहायला जाण्याबाबत दिनांक २९/०८/२०२२ रोजी ग्रामसभेत ठराव मंजूर केला आहे.
(५) जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे दिनांक १७/११/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार हनुमान कोळीवाड्याच्या दुबार पुनर्वसनासाठी जे.एन.पी.टी. ने मौजे फुंडे व जसखार येथील १०.१६ हे.आर. जमीन देण्याचे मान्य केले असून त्याबाबतचा लेआऊट (पुनर्वसन आराखडा) जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे सादर केला आहे. त्यानुषंगाने उपअधीक्षक, भूमि अभिलेख, उरण यांचेकडे सामिलीकरणाची व इतर अनुषंगिक बाबींची कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माणगाव (जि.रायगड) बस स्थानकाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४५) * १६४९८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव (जि.रायगड) बस स्थानकाची खड्ड्यांमुळे दुरवस्था होऊन प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माणगाव बस स्थानकाची इमारत जुनी झाली असून दिनांक ५ मार्च, २०२१ रोजी इमारतीचा स्लॅब प्रवासी बसायच्या जागेवर पडला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बस स्थानक परिसरात पिण्याचे पाणी व मूलभूत सुविधा नसून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले असणे तसेच पावसाळ्यात बस स्थानकाला तळ्याचे स्वरुप येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माणगाव बस स्थानक इमारतीचे नुतनीकरण, डागडुजी करणे, मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच बसस्थानक परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.
(३) प्रवाशांकरीता पिण्याचे पाणी व मूलभूत सुविधा उपलब्ध आहे. परंतु बसस्थानकात खड्डयांमुळे पावसाळयात पाणी साचते.
(४) व (५) चौकशी करण्यात आली आहे. माणगाव बसस्थानक इमारतीची डागडुजी केलेली आहे. मूलभूत सुविधा देण्यात आलेल्या असून बसस्थानक स्वच्छ ठेवण्यात येते. माणगाव बसस्थानकामधील वाहनतळाचे काँक्रिटीकरणाचे काम चालू आहे.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची संपकाळातील वैद्यकीय देयके प्रलंबित असल्याबाबत

**(४६) * १६२६१ श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची संपकाळातील रुपये चार कोटींची वैद्यकीय देयके प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके अदा करण्याकरीता निधीची तरतूद करुन प्रलंबित देयकांची रक्कम व्याजासह अदा करण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधी उपलब्ध करुन कर्मचाऱ्यांची वैद्यकीय देयके अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
कोरोना महामारीमुळे टाळेबंदी काळात व त्यानंतर रा.प. कर्मचारी यांनी पुकारलेल्या संपामुळे रा.प. महामंडळाच्या प्रवासी वाहतुकीतून मिळणारे उत्पन्न मोठ्या प्रमाणावर घटले आहे.
(३) नाही.
(४) व (५) निधी उपलब्धतेनुसार रा.प. कर्मचाऱ्यांची क्रमवारीने वैद्यकीय देयके अदा करण्यात येत आहेत.

-----------------

## पुणे महानगरपालिकेची मालमत्ता भाडे तत्वावर देण्याबाबत

**(४७) * १६३८३ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंहगड (जि.पुणे) रस्ता परिसरातील वडगांव ब्रुदुक भागात भारतरत्न पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी प्राथमिक विद्यालय, स्व.सुषमाजी स्वराज महिला बचत गट भवन, कै.कृष्णा गेनुभाऊ दांगट सांस्कृतिक भवन, कै.विठ्ठलराव नामदेव जाधव क्रिडा संकूल या इमारतींकरीता कोट्यवधी रुपये खर्च करुन इमारतीचे बांधकाम पूर्ण असतानाही सदरहू इमारत विनावापर बंद असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या मालकीची कोट्यवधीची मालमत्ता विनावापर बंद असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पुणे महानगरपालिकेची सदरहू मालमत्ता भाडेतत्वावर दिली असल्यास, महानगरपालिकेला महसूल मिळाला असता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे महानगरपालिकेची मालमत्ता भाडे तत्वावर देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

भारतरत्न पंतप्रधान स्व.अटल बिहारी वाजपेयी प्राथमिक विद्यालय या इमारतीचे काम पूर्ण झाले असून जागेवर मैदान विकसित करण्याचे व साईड मार्जीन डेव्हलपमेंटचे काम सुरू आहे. सदरहू इमारत पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली असून शिक्षण विभागाकडून भौतिक सुविधा विषयक कामांची पूर्तता करून शाळा स्थलांतर करण्याची प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

स्व.सुषमाजी स्वराज्य महिला बचत गट भवन इमारतीचे शौचलय, ड्रेनेज लाईन व इतर स्थापत्य विषयक कामे सुरू आहेत.

कै.कृष्णा गेनुभाऊ दांगट सांस्कृतिक भवन येथील ड्रेनेज लाईनचे काम सुरू आहे.

कै.विठ्ठलराव नामदेवराव जाधव क्रिडा संकूलचे बॅडमिंटन हॉलचे व ड्रेनेज लाईनचे कामे सुरू आहेत.

(२) इमारतीची कामे अपूर्ण असल्यामुळे बांधकाम विकास विभागाकडून भोगवटा पत्र प्राप्त झालेले नाही. सदरची कामे पूर्ण झाल्यानंतर भोगवटा पत्र घेवून इमारत वापरात आणण्याचे नियोजन असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिवडी-न्हावा शेवा पारबंदर प्रकल्प (एमटीएचएल) पूर्व मुक्त मार्गास जोडण्याबाबत

**(४८) * १६०८४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवडी-न्हावा शेवा पारबंदर प्रकल्प (एमटीएचएल) माहे डिसेंबर, २०२३ मध्ये पूर्ण होणार असून सदर प्रकल्प पूर्वमुक्त मार्गास जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्हावाशेवा येथील चिर्ले परिसरात बहुउद्देशीय विकास केंद्र विकसित करण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे, सदरहू निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) बाबत होय, हे खरे आहे.

प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुंबई पारबंदर प्रकल्पामुळे मौजे चिर्ले आणि सभोवतालच्या परिसराचा झपाटयाने विकास होण्याच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेशातील मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रासह एकूण ७ क्षेत्रांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४० मधील तरतूदीनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव दिनांक १३ मे, २०२२ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## नवी मुंबईत सिडकोने इमारतींच्या बांधकामांना सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीचे (जीडीसीआर) उल्लंघन करत मंजुरी दिल्याबाबत

**(४९) * १६२७४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत सिडकोकडून इमारतींच्या बांधकामांना सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीचे (जीडीसीआर) उल्लंघन करुन मंजुरी दिल्या जात असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नवी मुंबईतील इमारतींच्या बांधकामांना मंजुरी देताना अनामत रक्कम, छाननी शुल्क इत्यादीची फेररचना करण्यासह फ्लॉवरबेड, कपबर्ड, बाल्कनी, पॉकेट टेरेस अशा भागांचे बांधकाम प्रिमियम आकारुन चटईक्षेत्र निर्देशांकमुक्त (एफएसआय फ्री) करण्यात यावे, असा ठराव सिडकोच्या संचालक मंडळाने सन २००४ मध्ये पारित केला असून नागरिकांनी केलेल्या सूचना-हरकतींचा विचार करुन समितीने दिलेला अहवाल सिडको संचालक मंडळाने दिनांक २ डिसेंबर, २००५ रोजी किरकोळ बदलानंतर अंतिम केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार जीडीसीआर मधील संबंधित सुधारणांचा ठराव सिडकोने दिनांक ९ जानेवारी, २००६ रोजी शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला असून त्याला अद्याप मंजुरी मिळालेली नसतानाही सिडकोने बेकायदेशीरपणे कथित सुधारित डीसीआरची अंमलबजावणी सुरु करुन त्याबाबत सन २०१० मध्ये ‘नवी मुंबई जीडीसीआर-१९७५ साठी नियम’ अशा नावाने नियम केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवी मुंबईत अशाप्रकारे जीडीसीआर व राष्ट्रीय भवन संहितेचे उल्लंघन सुरु झाले असून अनेक विकासकांनी सदनिकांचे बांधकाम करताना फ्लॉवर बेड, पॉकेट टेरेस इत्यादींचे क्षेत्रफळ परस्पर खोल्यांमध्ये समाविष्ट करुन मोठ्या सदनिका बांधून, तसेच ग्राहकांकडूनही त्याप्रमाणे वाढीव शुल्क आकारुन शासनाचे नुकसान व ग्राहकांना आर्थिक भुर्दंड देवून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबईत इमारतींच्या बांधकामांना सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावलीचे (जीडीसीआर) उल्लंघन करत मंजुरी देणाऱ्या सिडकोच्या अधिकाऱ्यांवर तसेच नवी मुंबईत डीसीआरच्या तरतूदींचे उल्लंघन करत उभ्या राहिलेल्या सर्व बेकायदा इमारतींबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) अधिमुल्य आकारणी करून कपबोर्ड, फ्लॉवर बेड इ. बाबी चटई क्षेत्र निर्देशांक मुक्त करून त्या अनुज्ञेय करण्याची तरतूद नवी मुंबई क्षेत्रासांठी लागू असलेल्या सर्वसाधारण विकास नियंत्रण नियमावली, १९७५ मध्ये समाविष्ट करण्याअनुषंगाने सिडको संचालक मंडळाने दिनांक २३/१२/२००४ रोजी ठराव पारित करून त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) ची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून सिडको संचालक मंडळाने दिनांक ०२/१२/२००५ रोजी ठराव पारीत करून तसा प्रस्ताव सिडकोने दिनांक ०९/०१/२००६ च्या पत्रान्वये शासनास मंजूरीकरीता सादर केला होता. सदरच्या फेरबदल प्रस्तावास शासनाकडून कलम ३७(२) मधील तरतूदीनुसार मंजूरी मिळण्यापुर्वीच संचालक मंडळाच्या मंजूरीने व सिडकोने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार सदर तरतूदीची अंमलबजावणी सिडकोकडून करण्यात येत होती. या संदर्भात श्री.संजय कुमार सुर्वे यांनी शासनाकडे तक्रार दाखल केली असून मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१५४/२०१६ दाखल केली आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असून, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, प्रकरणी त्यानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिका हद्दीतील रामकी कंपनीच्या इंडस्ट्रीयल हझार्ड्स वेस्टवर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(५०) * १५६५० श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील सिद्धी करवले गावासह आजुबाजूच्या परिसरात रामकी कंपनीच्या इंडस्ट्रीयल हझार्ड्स वेस्टवर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पामुळे हवेचे आणि पाण्याचे प्रदूषण होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पावसाळ्यात सदर प्रकल्पातून वाहून येणाऱ्या प्रदूषित पाण्यामुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांची शेत पिके खराब होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रामकी कंपनीच्या इंडस्ट्रीयल हझार्ड्स वेस्टवर प्रक्रिया किती क्षमतेचे विघटन करण्यास परवानगी मिळाली आहे, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रश्नाधीन प्रकल्पामध्ये वार्षिक १,२०,००० मे. टन इतक्या क्षमतेस भुभराव करण्यास व वार्षिक ३०,००० मे. टन इतक्या क्षमतेच्या भस्मीकरण करण्यास सशर्त संमतीपत्र प्रदान केले असून त्याची वैधता २८/०२/२०२५ पर्यंत आहे.
(४) प्रश्नाधीन प्रकल्पाच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारीस अनुसरुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०६/०८/२०२२ रोजी केलेल्या पाहणीमध्ये रामकी (MWML) प्रकल्पास प्रदान केलेल्या संमतीपत्रामधील काही अटी व शर्तीचे पालन करत नसल्याचे आढळून आले होते. त्यामुळे सदर प्रकल्पास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ११/०८/२०२२ रोजी कारणे दाखवा नोटीस व दिनांक ११/११/२०२२ रोजी प्रस्तावित आदेश दिले आहेत. सदर आदेशानूसार प्रकल्पाची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा असलेली रुपये ०५.०० लक्ष बँक हमी जमा करण्याचे आदेश संबंधित बँकेस देण्यात आले आहेत. तसेच रुपये १०.०० लक्ष महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे जमा करण्याचे आदेश पारित करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या खड्डे दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(५१) * १५१९१ श्री.प्रसाद लाड, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत रस्त्यांच्या कामासाठी मुंबई महानगरपालिकेने २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात रुपये १ हजार ८०० कोटींची तरतूद केली होती, त्यानंतर आणखी रुपये ४०० ते ५०० कोटींची वाढ करत सुमारे रुपये २ हजार २०० कोटींच्या निविदा मागविण्यानंतर सुरु करण्यात आलेली रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे अद्याप अपूर्णावस्थेत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू कामे निकृष्ट दर्जाची होऊन रस्त्यांमध्ये मोठे खड्डे पडल्यामुळे होणाऱ्या त्रासाबद्दल नागरिकांनी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचेकडे सातत्याने तक्रारी केल्या आहेत, तसेच मुंबईतील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी महानगरपालिकेने पुन्हा रुपये ६० कोटी खर्च केल्यानंतरही रस्त्याच्या मूळ कामात तसेच खड्डे बुजविण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याने या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधित दोषीविरोधात कारवाई करण्याची मागणी महानगरपालिकेतील माजी विरोधी पक्षनेते यांनी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) मुंबई महानगरपालिकातर्फे मुंबई खड्डे मुक्त करण्यासाठी महानगरपालिकेच्या २४ विभागाला स्वतःचा कोल्डमिक्स खरेदी करण्यासाठी रुपये ५० लाखांचा निधी पावसाळ्यापूर्वी वितरित केला असून सदर निधी अपुरा पडत असल्यामुळे प्रत्येकी २४ विभागाला आणखी रुपये ५ लाखांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असूनही महानगरपालिकेकडे खड्ड्यांविषयी अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील खड्ड्यांविषयी महानगरपालिकेकडे तक्रारी प्राप्त झाल्यावर ४८ तासांत तक्रारी दूर करण्याचे आदेश महानगरपालिकेकडून प्रत्येक विभागाच्या कार्यालयांना देण्यात येवूनही महानगरपालिकेच्या विभागांकडून तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या खड्डे दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषीवर कारवाई करुन मुंबईतील रस्ते खड्डेमुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या कामाकरीता सन २०२१-२२ मध्ये महानगरपालिकेमार्फत रुपये २२८० कोटीच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर कामांचे कार्यादेश माहे जानेवारी, २०२२ ते मार्च, २०२२ पर्यंत देण्यात आले आहेत.

सदर कामाचा कालावधी पावसाळा वगळून १८ ते २४ महिने असा असून, सदर कामे पुढील तीन आर्थिक वर्षांत विभागली आहेत. त्यामुळे वाहतूक पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर काही कामे हाती घेण्यात आली आहेत व उर्वरित कामे पुढील कालावधीत करण्यात येणार आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) सिमेंट कॉंक्रीटीकरणाद्वारे नवीन बनविण्यात आलेल्या रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडल्याचे दिसून आलेले नाही. तथापि, दोषदायित्व संपलेल्या व निविदेत समाविष्ट नसलेल्या रस्त्यांवरील खड्डयांच्या तक्रारींबाबत विकसित करण्यात आलेल्या विविध तक्रार निवारण यंत्रणांमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

मुंबईतील रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामात गैरव्यवहाराबाबतची बातमी दिनांक २५ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या "महाराष्ट्र टाईम्स" या स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सुमारे २०५० कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. त्यापैकी ९९० कि.मी. लांबीच्या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण पूर्ण करण्यात आले असून, उर्वरित डांबरी रस्त्यांची टप्प्याटप्प्याने सिमेंट कॉंक्रिटीकरणाद्वारे सुधारणा करण्याचे प्रस्तावित आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात कमी वेळात मोठ्या प्रमाणात पडणारा पाऊस, मुंबईची भौगोलिक स्थिती, जमिनीखालील पाण्याची उच्चस्तर पातळी, मिश्र वाहनांची वर्दळ व घनता, रस्त्याशेजारील झोपडपट्टी व अन्य यांचे होणारे अतिक्रमण व उपयोगिता सेवा कंपन्यांमार्फत वारंवार होणारे खोदकाम तसेच डांबराच्या गुणधर्मानुसार पावसाळयात पाण्याच्या संपर्कात आल्यामुळे रस्त्यांवर खड्डे पडतात. सदर खड्डयांपैकी हमी कालावधीत नसलेल्या रस्त्यांवरील खड्डे विभागस्तरावर नेमलेल्या कंत्राटदारांमार्फत पुन:स्थापित करण्यात येतात.

तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेस खड्डयांविषयी तक्रार प्राप्त झाल्यास त्याचे ४८ तासात निवारण करण्यात येते. तसेच, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या निरीक्षणात आलेले खड्डे तसेच खराब पृष्ठभागाचे पुन:स्थापन करुन रस्ते सुव्यवस्थित ठेवण्याचे प्रयत्न केले जातात.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित धोरणानुसार प्रत्येक विभागासाठी दरवर्षी खड्डे भरण्यासाठी रुपये ५० लाख व पावसाळ्यापूर्वी दुरुस्तीसाठी रुपये १.५० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात येते.

रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी सन २०२२-२३ या वर्षासाठी सुमारे रुपये ४८ कोटी इतक्या निधीची तरतूद केली असून ती आवश्यकतेनुसार वापरली जाते. तसेच यावर्षी लांबलेल्या पावसामुळे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये प्रत्येक विभाग कार्यालयास अतिरिक्त रुपये ५ लाख रुपये खड्डे बुजविण्यासाठी देण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिकेतील बहुतांश संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळाला नसल्याबाबत

**(५२) * १५६३० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला असूनही महानगरपालिकेतील ३४० संवर्गातील ११७ संवर्गांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळाला नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेतील ६६०० कर्मचाऱ्यांपैकी केवळ १५५४ कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाचा लाभ मिळाल्यामुळे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिकेतील ३४० संवर्गातील ११७ संवर्गांना सातवा वेतन आयोगाचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कार्यरत अधिकारी / कर्मचाऱ्यांना व सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचाऱ्यांना विद्यमान ६ व्या वेतन आयोगामधील वेतन संरक्षित करुन ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यास दिनांक २१/१०/२०२१ च्या शासन पत्रान्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

सदरची मंजूरी प्रदान करताना महानगरपालिकेचे आर्थिक हित व ७ व्या वेतन आयोगाच्या वाढीव वेतन प्रदानामुळे महानगरपालिकेवर पडणारा आर्थिक बोजा या बाबी विचारात घेण्यात आल्या आहेत.

दरम्यान महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील ११७ संवर्गाला ७ वा वेतन आयोगाचे लाभ अनुज्ञेय करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत सादर करण्यात आलेल्या दोन विविध प्रस्तावाच्या अनुषंगाने दिनांक ०४/१०/२०२२ व दिनांक १४/११/२०२२ अन्वये शासन स्तरावरुन निर्देश देण्यात आले आहेत. उक्त निर्देशाच्या अनुषंगाने महानगरपालिका स्तरावर कार्यवाही करण्यात आल्याची बाब ठाणे महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणामुळे पुनर्वसित झालेल्या गावांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५३) * १६१६८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील हतनूर धरणामुळे पुर्नवसित झालेल्या १८ गावांतील नागरी सुविधा अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तांदळवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील प्रकल्पग्रस्तांनी रहिवाशांसाठी भूखंड मिळावा म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी हतनूर जलाशयात जलसमाधी आंदोलन केले असून याप्रकरणी मा.औरंगाबाद खंडपीठाने प्रकल्पग्रस्थांचे पुनर्वसन करुन भूखंड वाटप करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मांगलवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) गावाचे हतनूर प्रकल्पांतर्गत पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त रहिवाशांना भूखंड देण्यासह प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करुन नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हतनूर प्रकल्पामुळे बाधित होऊन पुनर्वसित झालेल्या एकूण ३३ गावांतील रुपये ४१.१३ कोटी किंमतीच्या एकूण २२३ नागरी सुविधाच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यापैकी १८८ नागरी सुविधांची कामे पूर्ण झालेली असून उर्वरित ३५ कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) तांदळवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) येथील १०५ प्रकल्पग्रस्तांचे हतनूर जलाशयात दिनांक १/११/२०२२ रोजी जलसमाधी आंदोलन करण्याबाबतचे निवेदन दिनांक २१/१०/२०२२ रोजी जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या कार्यालयात प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने प्रस्तावित अभिन्यासाची मोजणी करून संपादित जमिनीवर भूखंडनिहाय प्रत्यक्ष सीमांकन करण्यात येऊन प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाची कार्यवाही दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येईल, असे दिनांक १/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानंतर सदर आंदोलन मागे घेण्यात आले आहे.
(३) मांगलवाडी (ता.रावेर, जि.जळगाव) या गावातील घरांचे विशेष बाब म्हणून पुनर्वसन करण्याचे विभागीय आयुक्त, नाशिक यांचेमार्फत प्रस्तावित करण्यात आले असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रस्तावित अभिन्यासाची मोजणी करून संपादित जमिनीवर भूखंडनिहाय प्रत्यक्ष सीमांकन करण्यात येऊन प्रकल्पग्रस्तांना भूखंड वाटपाची कार्यवाही प्रस्तावित आहे. तसेच नागरी सुविधांच्या कामांकरीता आजपावेतो एकूण रक्कम रूपये ३२.३० कोटी खर्च झालेला असून उर्वरित कामांकरीता आवश्यक असलेला रूपये १३.३२ कोटी निधी, प्रकल्प यंत्रणेकडून परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर वितरित करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुस्लिम समाजाच्या विकासासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम संशोधन आणि मानव विकास स्वायत्त संस्था स्थापन करण्याबाबत

**(५४) * १५४३७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४२७९ ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सारथी, बार्टी, महाज्योतीच्या धर्तीवर मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक स्थिती मजबूत करण्यासाठी आणि त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी, फेलोशिपसाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम संशोधन आणि मानव विकास स्वायत्त संस्था स्थापन करणेबाबत मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुस्लिम समाजाच्या विकासासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम संशोधन आणि मानव विकास स्वायत्त संस्था स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) शिष्यवृत्ती, प्रशिक्षण, वसतिगृहे, कौशल्य विकास, महिला सशक्तीकरण या योजना अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येतात. त्यामुळे प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईतील सीआरझेडमुळे बाधित झालेले शहरातील बांधकाम प्रकल्प भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असल्याबाबत

**(५५) * १६३१२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील किनारपट्टी नियमन क्षेत्र (सीआरझेड) मुळे बाधित झालेले शहरातील सुमारे २०० बांधकाम प्रकल्प भोगवटा प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम प्रकल्प भोगवट प्रमाणपत्राच्या प्रतिक्षेत असताना सिडकोने किनारपट्टी नियमन क्षेत्र (सीआरझेड) मध्ये असलेला ६२१ एकर क्षेत्रफळाचा भूखंड विक्रीसाठी काढला असून उक्त विक्रीसाठी काढलेल्या संपूर्ण क्षेत्रापैकी ३० टक्के क्षेत्र सीआरझेड १ मध्ये तर उर्वरित क्षेत्र सीआरझेड २ मध्ये मोडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी नाट कनेक्ट फाऊंडेशनने पर्यावरण विभागाकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नवी मुंबईतील सीआरझेडमुळे बाधित झालेल्यांना शहरातील बांधकाम प्रकल्प भोगवटा प्रमाणपत्र देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील सीआरझेड-II ने बाधित एकूण १२८ छोट्या व मोठ्या प्रकल्पांना बांधकाम परवानगी मंजूर करण्यात आली आहे. तथापि, सदर प्रकल्पांना सीआरझेड च्या ना-हरकत दाखल्याअभावी भोगवटा प्रमाणपत्र मंजूर करण्यात आलेले नाही. त्यासंदर्भातील प्रस्ताव नवी मुंबई महानगरपालिकेकडून केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडे दिनांक ६/१२/२०१३ रोजी व राज्य शासनाच्या पर्यावरण विभागाकडे दिनांक १७/०४/२०२२ रोजी कार्योत्तर मंजूरीसाठी (Post Facto Clearance) सादर करण्यात आले आहेत.
(२) हे अंशत: खरे आहे.

सिडकोने नेरुळ, सेक्टर-५४,५६ व ५८ येथील भूखंड क्र. २ए, क्षेत्र-६.२१ एकर (२५१३८.८६ चौ.मी.) चा भूखंड विक्रीस काढला आहे. सदर भूखंडाचे अंदाजे २२ टक्के क्षेत्र सीआरझेड -IA आणि ३३ टक्के क्षेत्र सीआरझेड -II अंतर्गत येत असून उर्वरित क्षेत्र सीआरझेड मध्ये येत नाही.
(३) हे खरे आहे.

नाट कनेक्ट फाऊंडेशन यांनी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडे तक्रार दाखल केली आहे.
(४) सिडकोमार्फत सीआरझेड मुळे बाधित होणाऱ्या भूखंडाबाबतचा एकत्रित प्रस्ताव महाराष्ट्र सागर तटीय क्षेत्र नियंत्रण प्राधिकरण (MCZMA) यांचेकडे दिनांक २७/०५/२०२२ रोजी सादर केला असून उक्त प्राधिकरणाची मान्यता/ ना-हरकत मिळाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र देण्याची नियमोचित कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील एव्हीजी-बीव्हीजी या कचरा उचलणाऱ्या कंत्राटदार कंपनीच्या चौकशी अहवालातील दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(५६) * १६५४५ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरात कचऱ्याची उचल करणाऱ्या एव्हीजी व बीव्हीजी या कंपन्यांच्या गैरव्यवहाराबाबत चौकशी समितीचा अंतिम अहवाल शासनाकडे प्राप्त होऊन सात महिन्यांचा कालावधी होऊनही कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अहवालात कंपनीसह प्रशासनातील अनेक अधिकारी व कर्मचारी दोषी आढळून आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अहवालात दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही, या प्रकरणाची चौकशी नागपूर महानगरपालिका स्तरावर करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही. या चौकशी प्रकरणात अधिकारी/ कर्मचारी दोषी आढळून आले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ता कराची थकबाकी वसूली करण्यात अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५७) * १६५२३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील मालमत्ता कर वसूल करण्यात विलंब केल्याप्रकरणी आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना निलंबित करुन विभागीय चौकशी सुरु करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका हद्दीतील एन.आर.सी. कंपनीवर मालमत्ता करापोटी माहे मार्च, २०२२ अखेर पर्यंत रुपये १५२,७२,९४,५२९/- थकबाकी असूनही थकीत मालमत्ता कराची रक्कम कंपनीच्या सातबारावर दर्शविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेतील मालमत्ता कर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी थकीत मालमत्ता कराची रक्कम दर्शविली नसल्यामुळे एन.आर.सी. कंपनी व मे.अदानी कंपनी यांना जमीन खरेदी व्यवहार करता आला असून कंपनीमध्ये असलेली आरक्षणे डी.पी. रोड स्थलांतरित करुन कंपीनीच्या जागेत बांधकाम करण्यास नगररचना विभागाने परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व नगररचना विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी आर्थिक संगनमतामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले असून उक्त प्रकरणी विभागीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे काय, समितीचा चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय अथवा केव्हा सादर करण्यात येणार आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एन.आर.सी. कंपनीची मालमत्ता कराची रक्कम वसूल करण्याबाबत तसेच मालमत्ता कर वसूल न करणाऱ्या व कंपनीच्या जमिनीवर असलेली आरक्षणे स्थालांतरित करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून बडतर्फ करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) • मालमत्ता कराची थकीत रक्कम कंपनीच्या सात-बारावर नोंद करणेकामी व सात-बारा महानगरपालिकेच्या नावे नोंदविणेबाबत तहसिलदार, कल्याण यांना दिनांक ३१/०३/२०१७ रोजी महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

- मे.एन.आर.सी. व मे.अदानी कंपनी यांच्यातील जमीन खरेदी व्यवहार झाल्याची बाब, महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेली नाही.
- केंद्र शासनाच्या मध्य रेल्वेची प्रस्तावित कल्याण-कसारा रेल्वे लाईन क्र. ३ व ४ करीता संपादित करावयाची जागा अस्तित्वातील विद्यमान १२ मी. रूंद (मंजूर विकास योजनेतील ३० मी. रूंद रस्त्याचा भाग) रस्त्याने बाधित होत असल्याने व सदर रस्त्याचा वापर सद्य:स्थितीत महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांकडून होत असल्याने, सदर रस्त्याची जागा मध्य रेल्वे विभागास हस्तांतरीत करण्यापूर्वी, पर्यायी रस्ता विकसित करणे आवश्यक आहे.
- सदर रस्त्याच्या स्थानांतरणाकरीता प्राप्त प्रस्तावाची UDCPR मधील तरतूदींनुसार छाननी करून ३० मी. रूंद रस्त्याच्या रूपरेषा व त्यासंलग्न आरक्षणे यांचे स्थानांतर करण्यासाठी महानगरपालिकेने तत्वत: मंजूरी प्रदान केलेली आहे.
- स्थानांतरणाकरीता प्रस्तावित असलेली रस्त्याची पर्यायी जागा ही मे.एन.आर.सी. कंपनीच्या मालकीची आहे.
- मे.एन.आर.सी. यांनी त्यांच्या भूखंडाच्या काही क्षेत्रावर ३ वेअर हाऊसचे बांधकामाबाबत प्रस्ताव महानगरपालिकेकडे सादर केले आहेत. मात्र सदर प्रस्तावाची छाननी सुरू असून, बांधकाम करण्यास महापालिकेच्या नगररचना विभागाने कोणतीही परवानगी दिली नसल्याची वस्तुस्थिती, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) • महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत कोणतीही बांधकाम परवानगी दिलेली नसल्याने, तसेच, मालमत्ता कराची येणे रक्कम निर्लेखित केलेली नसल्याने, महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

- त्यामुळे सदर प्रकरणी विभागीय चौकशी समिती स्थापन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कराचे येणे रक्कम वसुलीकरीता दि नॅशनल कंपनी लॉ ॲपिलंन्ट ट्रिब्युनल (NCLT) नवी दिल्ली येथे कंपनी विरूध्द दावा दाखल करण्यात आलेला आहे.

- सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील इमारतीच्या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(५८) * १६३४२ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) कॅम्प-५ परिसरातील “मानस” टॉवर इमारतीचा स्लॅब कोसळून ४ जणांचा मृत्यू झाल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर येथे महिन्याभरात इमारत कोसळण्याची तिसरी घटना घडली असून सदरहू इमारत दुर्घटनेच्या स्थळाची आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका तसेच अन्य संबंधित अधिकाऱ्यांनी पाहणी करुन इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची नोटिस दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारत दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सदर दुर्घटनेची चौकशी करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०९/२०२२ रोजी चौकशी समिती स्थापन करण्यात आली.

त्यानुसार, "मानस टॉवर" ही इमारत उल्हासनगर महानगरपालिकेने प्रसिध्द केलेल्या धोकादायक इमारतीच्या यादीत समाविष्ट नव्हती. तथापि, सदर इमारतीमधील रहिवाशांना उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक २४/०५/२०२१ व दिनांक २२/०७/२०२२ रोजी नोटीस बजावून इमारतीची संरचनात्मक तपासणी करण्यासाठी सूचित करण्यात आले होते. त्यानुसार इमारतीमधील रहिवाशांनी इमारतीची संरचनात्मक तपासणी करुन नियमानुसार इमारतीची दुरुस्ती करुन इमारत सुस्थितीत असल्याबाबत अहवाल सादर करणे आवश्यक होते. तथापि, इमारतीच्या रहिवाशांनी इमारतीची संरचनात्मक तपासणी विहित मुदतीत केली नव्हती. त्यामुळे सदर दुर्घटना घडण्यास इमारतीमधील रहिवाशी प्रथमदर्शनी जबाबदार आहेत, असा अहवाल चौकशी समितीने सादर केला आहे.

सदर अहवालास अनुसरुन इमारतीमधील रहिवाशांना नोटीस बजावून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

तसेच, सदर दुर्घटनेतील मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना कोणतीही आर्थिक मदत देण्यात आलेली नाही, असे उल्हासनगर महानगरपालिकने कळविले आहे.

प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अहवालामध्ये सदर इमारत अधिकृत असल्याबाबत कोणताही उल्लेख नाही. तसेच सदर इमारतीस स्थानिक प्राधिकरणाकडून खाली करण्याबाबत नोटीस दिल्याचे दिसून येत नाही. सबब शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १९/०७/२०१८ मधील तरतूदींची पूर्तता होत असल्यास शासनाकडून मदत अनुज्ञेय करण्यात येते, असे महसूल व वन विभागाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या व्ही.एन. देसाई रुग्णालय, सांताक्रूझ येथे भूलतज्ञ उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५९) * १६४६४ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सांताक्रुज येथील व्ही.एन. देसाई रुग्णालयात भूलतज्ञ उपलब्ध नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, व्ही.एन. देसाई रुग्णालयात भूलतज्ञ उपलब्ध नसल्यामुळे गर्भवती महिलेला वांद्रे येथील भाभा रुग्णालयात हलविण्यात आल्याचे दिनांक १० सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन व्ही.एन. देसाई रुग्णालय, सांताक्रूझ येथे भूलतज्ञ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) सांताक्रुझ (पू), मुंबई येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विष्णुप्रसाद नंदराय देसाई रुग्णालयात प्रथम सत्रामध्ये ५ भूलतज्ञ डॉक्टर कार्यरत आहेत. तसेच द्वितीय व त्रितीय सत्रात तात्काळ सेवेकरीता खाजगी तत्वावर ३ भूलतज्ञ डॉक्टर उपलब्ध आहेत. या ३ खाजगी भूलतज्ञ डॉक्टरांना आवश्यकतेनुसार रुग्णालयामध्ये चक्रांकित पध्दतीने उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येते.

दिनांक १०/०९/२०२२ रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास २ महिन्यांची गर्भवती महिला रुग्णालयामध्ये उपचाराकरीता आली होती. सदर महिलेला तत्काळ शस्त्रक्रियेची आवश्यकता होती. परंतु, त्या दिवशी चक्रांकित पध्दतीने उपस्थित राहणारे खाजगी भूलतज्ञ डॉक्टर रुग्णालयामध्ये उपस्थित राहणार नव्हते. त्यामुळे वांद्रे येथील महानगरपालिकेच्या भाभा रुग्णालयातील भूलतज्ञ डॉक्टरची उपलब्धता पाहता गर्भवती महिलेला विहित पध्दतीचा अवलंब करुन भाभा रुग्णालयामध्ये उपचाराकरीता पाठविण्यात आले असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आपले सरकार पोर्टल वरील तक्रारी निकाली काढण्याबाबत

**(६०) * १६८१८ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नागरिकांच्या तक्रारींचे एकाच ठिकाणी निवारण करण्यासाठी शासनाने आपले सरकार पोर्टल अंतर्गत तक्रार निवारण प्रणाली स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रार निवारण प्रणाली मध्ये २१ दिवसांच्या आत तक्रार निकाली काढणे अपेक्षित असताना आपले सरकार पोर्टल वर मंत्रालय स्तरावर एकूण प्राप्त ३५६१८७ तक्रारींपैकी ८९४१९ तक्रारी म्हणजेच २६% इतके अर्ज प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तक्रारी प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तक्रारी प्रलंबित असल्याप्रकरणी संबंधित जबाबदार दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन सर्व प्रलंबित तक्रारी निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) तक्रारीबाबतची माहिती क्षेत्रिय कार्यालयाकडून विहित वेळेत प्राप्त न होणे, तक्रारी अन्य विभागाशी संबंधित असणे, त्यांच्या हस्तांतरणास वेळ लागणे, तांत्रिक बाबी.

(४) याबाबत सर्व विभागांकडून वारंवार आढावा घेण्यात येऊन तक्रारी विहित वेळेत निकाली काढण्याबाबत सूचना देण्यात येतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील रहेजा वसाहत, नॅशनल पार्क शेजारील विस्तार (बॉटलनेक) कमी करुन रस्ता रुंदीकरण करण्याबाबत

**(६१) * १६८४४ श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गोपिचंद पडळकर, डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील रहेजा वसाहत, नॅशनल पार्क शेजारील विस्तार (बॉटलनेक) कमी करुन रस्ता रुंदीकरण करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये तसेच तद्नंतर सातत्याने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता (विकास नियोजन) महानगरपालिका मुख्यालय इ. कडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करुनही कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील रहेजा वसाहत, नॅशनल पार्क शेजारील (बॉटल नेक) कमी करुन रस्ता रुंदीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२/१०/२०१७ रोजीच्या पत्रांन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस, नॅशनल पार्क शेजारील रहेजा विस्तार (बॉटलनेक) काढणेबाबत विनंती केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आर/मध्य विभागातील पश्चिम द्रुतगती महामार्ग व कुलूपवाडी जोड रस्त्यावरील मौजे कान्हेरी, ता.बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा येथील मूळ सर्वे क्रमांक १२, नगर भूमापन क्रमांक ५३७(भाग) मधील १८.३० मी. विकास नियोजन रस्त्याच्या रुंदीकरणामध्ये ०.०१८ हे. वनक्षेत्र बाधित होत आहे.

त्यामुळे बाधित ०.०१८ हे. वनक्षेत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वळते करण्याकरीता वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांचेकडे महानगरपालिकेमार्फत पत्रव्यवहार करण्यात आला होता.

तद्नंतर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेमार्फत दिनांक ०६/११/२०२० रोजी वनहक्क प्रमाणपत्र महानगरपालिकेस प्राप्त झाले.

वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांचे मागणीनुसार महानगरपालिकेमार्फत दिनांक २७/११/२०२० रोजी, वनहक्क प्रमाणपत्र पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारच्या परिवेष या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले.

तद्नंतर महानगरपालिकेने दिनांक ०१/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये भूसंपादन प्रस्ताव वनसरंक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांना सादर केला.

वनसरंक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांचेकडून वेळोवेळी प्राप्त सूचनेनुसार महानगरपालिकेमार्फत त्यांना दिनांक २४/०३/२०२१, २०/१२/२०२१, ०१/०२/२०२२ व ०७/०३/२०२२ रोजी विविध नकाशे, आराखडे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

सद्य:स्थितीत, वनसंरक्षक व संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरिवली यांनी दिनांक ११/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विविध कागदपत्रे व आराखडे यांची पूर्तता करणेबाबत महानगरपालिकेस कळविले असून त्यानुषंगाने महानगरपालिकेमार्फत कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत ॲप आधारित खाजगी वाहन चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमावली करण्याबाबत

**(६२) * १५२०६ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड : तारांकित प्रश्न क्रमांक १३९२७ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सुरक्षित प्रवास व चांगली सेवा मिळण्याच्या दृष्टीने अनेक प्रवासी विशेषतः महिला प्रवासी उबर ॲप आधारित खाजगी व कॅब बुक करीत असून सदरहू कॅब कंपनी प्रवाशांच्या सुरक्षेची हमी, सेवेचा दर्जा आणि चालकाचे वर्तन याबाबतची हमी देत नसल्याचे कंपनीने कंत्राटात नमूद केले असून याबाबतचे प्रतिज्ञापत्र उबर कंपनीने मुंबई ग्राहक तक्रार मंचाकडे सादर केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच कंपनीच्या धोरणाचा भंग करणाऱ्या चालकावर कारवाई करण्याची तरतूद उबर कंपनीने केली असल्याने उबर कंपनीच्या कंत्राटात व तरतूदीमध्ये विसंगती असल्याचे दिसून येत असून उबर कंपनी मुंबई ग्राहक मंचास चुकीची माहिती देत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरात ॲप आधारित टॅक्सी चालकांकडून प्रवाशांची विशेषतः महिला प्रवाशांची गैरवर्तणूकीच्या घटना घडत असून ॲप आधारित कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणतीही नियमावली नसल्यामुळे ग्राहकांना न्याय मिळविण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईत ॲप आधारित खाजगी व कब चालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी नियमावली तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबई येथील ग्राहक मंचाकडे नव्हे तर ठाणे येथील अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नवी मुंबई यांचेकडे श्रीमती कविता शर्मा विरुध्द उबेर इंडिया सिस्टम्स प्रा.लि. ग्राहक तक्रार क्रमांक ६१/२०२१ मध्ये मा.ग्राहक मंचाने दिनांक २५/०८/२०२२ रोजीच्या अंतिम आदेशानुसार ग्राहकास दोषपूर्ण सेवा दिली असल्याबाबत निष्कर्ष नोंदविला असून त्यापोटी प्रतिवादी यांना नुकसान भरपाई व खर्चापोटी रुपये २०,०००/- इतका दंड मे.उबर कंपनी यांच्यावर ठोठावला आहे. या संदर्भातील बातमी दैनिक टाईम्स ऑफ इडिया या वृत्तपत्रात दिनांक २६/१०/२०२२ प्रसिध्द झाली आहे.

तथापि, उबर कंपनीच्या कंत्राटात व तरतूदीमध्ये विसंगती दिसून येत असल्याचा निष्कर्ष अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नवी मुंबई यांनी त्यांच्या आदेशामध्ये नोंदविल्याचे दिसून येत नाही.

(३), (४) व (५) समुच्चयक आधारित प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका (एल) क्र. ९७७५/२०२० मध्ये दिनांक ०७/०३/२०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यात Motor Vehicles Aggregator Guidelines, २०२० दिनांक ०७/०३/२०२२ पासून लागू करण्यात आली आहे.

त्याअंतर्गत अशा समुच्चयक आधारित (ॲप बेस्ड) प्रवासी सेवा देणाऱ्या कंपन्यांनी समुच्चयक अनुज्ञप्ती प्राप्त करुन घेण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार राज्यात एकूण १७ समुच्चयकांना अनुज्ञप्ती जारी करण्यात आली आहे.

-----------------

## माझगांव (मुंबई) येथील प्रिन्स अली खान रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(६३) * १५४७७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रिन्स अली खान, माझगांव (मुंबई) या ७५ वर्षे जुन्या रुग्णालय इमारतीच्या संरचनात्मक तपासणीच्या अहवालात सदरहू इमारत धोकादायक असल्याने दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी रुग्णालयातील रुग्णांना अन्यत्र हलविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने कर्मचारी व कामगार संघटनेला विश्वासात न घेता अचानक रुग्णालय बंद केल्यामुळे ९५० कर्मचाऱ्यांवर नोकरी गमावण्याची वेळ आली आहे, तसेच इमारत पुनर्विकासासाठी देऊन रुग्णालय कायमस्वरुपी बंद करण्यात येत असल्याचा आरोप रुग्णालयातील कामगारांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालयातील कर्मचारी/कामगारांच्या नोकरीबाबतचा संभ्रम दूर करण्याबाबत तसेच प्रिन्स अली खान रुग्णालय पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील ३० वर्षांपेक्षा जुन्या इमारतींना संरचनात्मक लेखापरिक्षण करण्याकरीता दरवर्षी पावसाळ्यापूर्वी खबरदारीचा उपाय म्हणून महानगरपालिकेमार्फत मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५३-ब अन्वये नोटीस देण्यात येते. त्यानुसार महानगरपालिकेच्या 'ई' विभागामार्फत दिनांक २९/०६/२०२२ रोजी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ३५३-ब अन्वये प्रिन्स अली खान रुग्णालयाच्या इमारतीचे संरचनात्मक लेखापरीक्षण करण्याकरीता नोटीस देण्यात आली.

तद्नंतर प्रिन्स अली खान रुग्णालय प्रशासनाने महानगरपालिका परवानाधारक संरचनात्मक सल्लागार यांच्यामार्फत संरचनात्मक लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक २२/०८/२०२२ रोजी महानगरपालिकेस सादर केला. सदर अहवालामध्ये, रुग्णालयाची इमारत धोकादायक (सी-१ श्रेणीमध्ये) असल्याचे नमूद करण्यात आले होते.

तथापि, प्रिन्स अली खान रुग्णालयाच्या कामगार संघटना तसेच मा.लोकप्रतिनिधी यांचेमार्फत सदर अहवालाबाबत आक्षेप असल्याचे महानगरपालिकेस कळविण्यात आले.

प्रिन्स अली खान रुग्णालय प्रशासनाने महानगरपालिकेस सादर केलेल्या संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालावर महानगरपालिकेने कार्यवाही करावी म्हणून रुग्णालयाच्या प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्रमांक २७६३६/२०२२ दाखल केली. सदर प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १२/०९/२०२२ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस स्थळ पाहणी करुन अहवाल गोपनीयरित्या सादर करण्याचे आदेश दिले. त्यानुषंगाने महानगरपालिकेने स्थळ पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल दिनांक ०४/१०/२०२२ रोजीच्या सुनावणीवेळी मा.उच्च न्यायालयासमोर सादर केला.

सदर सुनावणीमध्ये मा.न्यायालयाने, याचिकाकर्ता प्रिन्स अली खान रुग्णालय प्रशासन यांनी स्वखर्चाने रुग्णालयाच्या इमारतीचे भारतीय प्रौद्योगिक संस्था (मुंबई) यांच्यामार्फत संरचनात्मक लेखापरिक्षण करुन त्याबाबतचा अहवाल भारतीय प्रौद्योगिक संस्था (मुंबई) यांनी गोपनीयरित्या परस्पर मा.न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिले आहेत. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(२) व (३) प्रिन्स अली खान हे रुग्णालय खाजगी असून ते सद्य:स्थितीत बंद आहे. रुग्णालयातील रुग्णांना अन्यत्र हलविणे, रुग्णालय बंद करणे व त्यानुषंगीक निर्णय हे पूर्णतः प्रिन्स अली खान रुग्णालय प्रशासनाचे आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भोकर नगरपरिषदेतील तत्कालीन मुख्याधिकारी यांनी शासकीय निधीचा अपहार केल्याबाबत

**(६४) * १५५१७ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकर नगरपरिषद अंतर्गत खोटी कागदपत्रे तयार करुन लाखो रुपयांचा शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी हे दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ ते २९ नोव्हेंबर, २०१९ पर्यंत पोलीस स्टेशन भोकर, जि.नांदेड येथे गु.र.नं. १३४/१८ कलम-४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४०६, ४०९, ४१४, १२०-ब, १६६(अ), ३४ भा.दं.वि. अन्वये ४८ तासांपेक्षा जास्त वेळ आरोपी म्हणून पोलीस कोठडीत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषद अंतर्गत शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी पोलीस कोठडीत असलेले तत्कालीन मुख्याधिकारी यांना निलंबित केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधितांच्या अटकेची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षकांनी दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी जिल्हा प्रशासन अधिकारी, नगरविकास शाखा, बीड यांना अहवाल देऊनही नियमाप्रमाणे वरिष्ठांकडे निलंबनाचा प्रस्ताव न पाठवता जाणीवपूर्वक आरोपीस सहकार्य करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन मुख्याधिकारी यांच्यावर भोकर नगर परिषदेमध्ये दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ ते २९ नोव्हेंबर, २०१९ व माजलगाव नगर परिषदेमध्ये दिनांक ४ मार्च, २०२० ते ६ मार्च, २०२० पर्यंत शासकीय निधीच्या अपहार प्रकरणी पोलीस कोठडीत असतानाही त्यांना नियमाप्रमाणे निलंबित न करता दिनांक १८ जानेवारी, २०२१ च्या शासन आदेशान्वये गट-ब संवर्गातून मुख्याधिकारी गट-अ पदी पदोन्नती देण्यात आलेली असून वेतनश्रेणीही देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित मुख्याधिकाऱ्यांना नियमाप्रमाणे निलंबित करुन त्यांना दिलेली पदोन्नती रद्द करण्याबाबत तसेच त्यांना सहकार्य करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.

सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, भोकर यांनी सादर केलेल्या अहवालात तत्कालीन मुख्याधिकारी यांच्या अटकेच्या कालावधीबाबत संदिग्धता असल्याने त्याबाबत अतिरिक्त माहिती दिनांक १५/०२/२०२० व दिनांक ०२/०९/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आली होती. त्यामुळे त्यांचे निलंबन करण्यात आले नव्हते.
(५) उक्त प्रकरणी अपचारी मुख्याधिकारी ४८ तासांपेक्षा अधिक कालावधी करीता कोठडीत असल्याचे स्पष्ट होत असल्याने त्यांच्याविरुध्द दिनांक २७/११/२०१९ पासून मानीव निलंबनाबाबतची कारवाई करण्यात येत आहे. तसेच ते सध्या कोठेही कार्यरत नाहीत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथे सी-बँड डॉपलर रडार बसविण्याबाबत

**(६५) * १५९६२ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यातील शेतकऱ्यांना हवामानाचा अचूक अंदाज मिळण्यासाठी पृथ्वी व विज्ञान मंत्रालयाच्या वतीने औरंगाबाद येथे सी-बँड डॉपलर रडार बसविण्याबाबतची मान्यता सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू यंत्रणेमुळे अतिवृष्टी, ढगफुटी, दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीचे क्लाऊड मॉनिटरींग करणे सोपे जाणार असल्याने सदर यंत्रणा प्रत्यक्षात कार्यान्वित करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदरहू यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू यंत्रणा बसवून कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) पृथ्वी व विज्ञान मंत्रालयाने दिनांक २४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, पृथ्वी व विज्ञान मंत्रालयाच्या तज्ञांच्या समितीने औरंगाबाद येथे सी-बँड डॉपलर रडार बसविण्यासाठी जागेची पाहणी केलेली असून औरंगाबाद जिल्ह्यातील मौजे म्हैसमाळ, ता.खुलताबाद येथील गट नं. १३२ मधील सार्वजनिक बांधकाम विश्रामगृहाची जागा सी-बँड डॉपलर रडार बसविण्यासाठी योग्य असल्याचे कळविले आहे.

सदर जागा वन विभागाच्या अखत्यारीत असल्याने सी-बँड डॉपलर रडार बसविण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत उपवनसंरक्षक, औरंगाबाद वनविभाग यांना जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी दिनांक १८/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे.

सदरहू यंत्रणेमुळे अतिवृष्टी, ढगफुटी, दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीचे क्लाऊड मॉनिटरींग करणे सोपे जाणार आहे. सदर बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून अद्यापी सदर यंत्रणा प्रत्यक्षात कार्यान्वित करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खेराडे-विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत

**(६६) * १५११५ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड : तारांकित प्रश्न क्रमांक ११९०० ला दिनांक ११ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेराडे-विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील गट क्रमांक ४४४ मधील दगडी बंधाऱ्याची पडझड झाली असून सदर बंधाऱ्यातून पाणी गळती होऊन बंधारा परिसरातील शेतीपिकांचे नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ मध्ये तत्कालीन मा.मृद व जलसंधारण मंत्री यांनी सदर बंधारा जुना व दगडी बंधारा असून बंधाऱ्याची पडझड झालेली असल्यामुळे त्याठिकाणी दुरुस्ती ऐवजी नवीन सिमेंट बंधारा बांधकाम करण्याचे आदेश जिल्हा परिषद (ल.पा.) उपविभाग, विटा यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तत्कालीन मा.मृद व जलसंधारण मंत्री यांनी आदेश देऊन सहा महिने होऊनही सदर बंधाऱ्याच्या बांधकामाबाबत कोणती कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू बांधणाऱ्याचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

खेराडे विटा (ता.कडेगाव, जि.सांगली) येथील गट क्र. ४४४ मधील दगडी बंधाऱ्याची पडझड झाली आहे. तथापि, परिसरातील शेती पिकांचे नुकसान झालेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

सदर बंधाऱ्याच्या जागेवर प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यानुसार ओढा पात्रात मोठ्या प्रमाणात पाणी प्रवाह सुरु असल्याकारणाने पाणी प्रवाह कमी झाल्यानंतर बंधाऱ्याच्या खालील बाजुस नवीन गेटेड बंधारा कामाचे सविस्तर सर्व्हेक्षण करुन प्रचलित मापदंडानुसार अंदाजपत्रक तयार करुन सदर काम सन २०२२-२३ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेमधुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गावदेवी (मुंबई) येथील प्रसिध्द मणिभवन इमारतीस लँबनस हाऊस इमारतीच्या पुनर्विकासामुळे धोका पोहोचत असल्याबाबत

**(६७) * १५८३५ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गावदेवी येथील प्रसिध्द मणिभवन या इमारतीस लँबनस हाऊस इमारतीच्या पुनर्विकासामुळे धोका पोहोचण्याची भीती संस्थेने व्यक्त केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावदेवी हा हेरिटेज परिसर म्हणून घोषित करण्यात आला असल्याने या परिसरातील इमारतीचा विकास करताना हेरिटेज विभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर इमारतीचा पुनर्विकास करताना मुंबई महापालिकेने कायदेशीर आणि तांत्रिक बाबीची पूर्तता केली आहे काय,

(४) असल्यास, मणिभवनपासून जवळ असलेल्या लँबनस हाऊस इमारतीचा पुनर्विकास सुरू करताना मणिभवन व इतर शेजारील इमारतींना धोका पोहोचू नये यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर इमारतीचा पुनर्विकास करताना हेरिटेज विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले असून, विकास नियंत्रण व प्रोत्साहक नियमावली २०३४ अन्वये मंजुरी घेऊन सदर प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर, सदर इमारतीचे यापुढील पुनर्विकासाचे काम करतांना मणिभवन व इतर शेजारील इमारतींना धोका पोहोचू नये याकरीता आय.आय.टी. कडून कार्यपध्दती प्राप्त करुन ती सादर करण्याबाबत तसेच, कोणत्याही प्रकारची मालमत्ता अथवा जीवितहानी टाळण्याकरीता योग्य त्या सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्याचे निर्देश सदर इमारतीच्या विकासकास व वास्तुविशारदास निर्देश देण्यात आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबईत प्रदूषण करणाऱ्या कंपनी/कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६८) * १५५७१ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील जुईनगर रेल्वे स्थानकालगतच्या नाल्यात कंपन्यांमधून रसायनमिश्रित पाणी रात्रीच्या वेळी सोडले जात असल्यामुळे सदर रसायनमिश्रित पाणी खाडीमध्ये गेल्यामुळे जैवविविधतेवर आणि माशांच्या उत्पादनावर विपरित परिणाम होत असल्याच्या तसेच निसर्गाचा ऱ्हास होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी शासनाकडे केल्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील रासायनिक कंपन्यांमधून रात्रीच्यावेळी प्रदूषित वायू सोडले जात असल्याने कोपरखैरणे, महापे, बोनकोडे, कोपरी परिसरात दुर्गंधी हवा पसरुन नागरिकांना मळमळणे तसेच श्वास घेण्यास अडचणी येणे इ. त्रास होत असल्याचे तसेच नवी मुंबईतील रबाळे, महापे व पावणे औद्योगिक क्षेत्रामध्ये असणाऱ्या कारखान्यांमधून रसायनमिश्रित पाणी सोडले जात असल्याने नागरिकांना आरोग्याच्या समस्या उद्भवू लागल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रसायनमिश्रित पाणी नाल्यामध्ये सोडणाऱ्या कंपनी/कारखान्यांवर कारवाई करुन प्रदूषण रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

स्थानिक वृत्तपत्रामध्ये दिनांक १६ ऑगस्ट, २०२२ रोजी जुईनगर नाल्यातील पाणी काळपट झाल्याबाबत बातमी प्रकाशित झाली होती.
(२) नवी मुंबई महानगरपालिकेकडून आरोग्य तक्रारी संबंधित अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झाला असून याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे नमूद केलेले आहे.
(३) या प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे तपासणी करण्यात आलेली असून दोषी कारखान्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना औद्योगिक सांडपाणी वाहन व्यवस्था दुरुस्तीचे वेळवेळी निर्देश दिलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेचा लाभ देण्याबाबत

**(६९) * १६२५७ श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेचा लाभ मिळत नसल्याचे दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, राज्य शासनाच्या धर्तीवर राज्य परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेचा लाभ देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी व महिला कर्मचाऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या धर्तीवर राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजेचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२), (३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवस कमाल मर्यादेपर्यंत बालसंगोपन रजेचा लाभ मिळण्यासाठी तरतूद आहे. शासन निर्णय वित्त विभाग क्र.संकीर्ण २०१७/प्र.क्र.२५/सेवा-६, दिनांक २३/०७/२०१८ अन्वये बालसंगोपन रजा मिळणेबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१०/२०१९ क्र.राप/आस्था/४०८ई(१) १३२९ दिनांक २५/०२/२०१९ व्दारे परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## पुणे शहरातील ओढे-नाल्यांवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत

**(७०) * १६३८४ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील नागझरी, भैरोबा आणि आंबिल ओढा या प्रमुख नाल्यांची पातळी अरुंद झाली असून मास्टर प्लॅनमध्ये २३ वॉटर शेड्स बेसीन असून त्यातील २५२ नाल्यांपैकी ५० ते ६० टक्के नाले बुजविण्यात आल्यानंतर त्यावर अतिक्रमण करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ओढे-नाल्यांवरील अतिक्रमणामुळे विकास आराखड्यातून ओढे-नाले नष्ट होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे शहरातील ओढे-नाल्यावरील अतिक्रमणे निष्कासित करुन ओढे-नाले रुंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे

पुणे शहरात एकूण २३ वॉटर बेसीन असून २३४ लहान मोठे नाले अस्तित्वात आहेत. त्यापैकी नागझरी, भैरोबा व आंबिल ओढा हे प्रमुख नाले आहेत. पुणे शहरातील मुख्य जुन्या गावठाण भागातून आंबिल ओढा व नागझरी नाला तसेच शहराच्या पूर्वेस भैरोबा नाला असे ३ नाले वाहतात.

आंबिल ओढा या नाल्यावरील ३७ अतिक्रमणांवर व पुणे शहरातील अन्य नाल्यावर १८ अतिक्रमणांवर असे एकूण ५५ अतिक्रमणांवर माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर कार्यवाही करून नाले प्रवाह सुरळीत करण्यात आले आहे.

भैरोबा नाल्याचा वानवडी, रामटेकडी लगतचा बहुतांशी भाग पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड व एस.आर.पी.एफ. च्या हद्दीतून जात आहे. या भागातील शिंदे छत्री खड्डा वस्ती येथे नाल्यामध्ये पुणे कॅन्टोन्मेंट बोर्ड यांचेमार्फत क्रांक्रिटायझेशन केल्याचे निदर्शनास येत असल्याने सदरचे स्ट्रक्चर काढून घेण्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कॅन्टोन्मेंट बोर्डास कळविण्यात आलेले आहे.

सदर नाल्याच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा निर्माण होईल अशा कोणत्याही प्रकारचे खाजगी अनधिकृत बांधकाम अथवा अतिक्रमण नसून कोणताही नाला बुजविण्यात आलेला नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेले आहे.

(२) नाल्यामध्ये अतिक्रमण झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यावर कारवाई करून नाले प्रवाहित ठेवण्याची कारवाई पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील नाल्यांची साफसफाई करून गाळ, राडारोडा, कचरा काढण्याची कार्यवाही मलनि:सारण देखभाल दुरूस्ती विभागामार्फत दरवर्षी पावसाळ्यापूर्वी करण्यात येते. तसेच नाल्याचे खोलीकरण करण्यात येत असते. नाल्यालगत महानगरपालिकेच्या जागेवर सिमाभिंत बांधण्यात येतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पनवेल महानगरपालिकेकडून बांधण्यात आलेल्या व्यापारी गाळ्यांचे सुधारित वाटप करण्याबाबत

**(७१) * १५६५३ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिकेने ६ व्यापारी संकुलाचे बांधकाम करुन ३५५ व्यापारी गाळ्यांचे विद्यमान गाळेधारकांचे समावेशन व निविदा पध्दतीने आरक्षणानुसार वाटप करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळे ३० वर्षाकरीता तुटपुंजे रक्कम आकारुन भाडेतत्त्वावर देण्यात आले असून सदर भाडेतत्त्वावर करारनामा करण्याकरीता तसेच हस्तांतरणाला महासभेत मंजुरी मिळाली आहे, सदर प्रस्तावामुळे महानगरपालिकेचे सुमारे रुपये ५० ते ६० कोटींचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये तसेच गाळेधारकाकडूनही परवडणारे भाडे आकारावे, या धोरणानुसार गाळ्यांचे सुधारित वाटप करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ६ व्यापारी संकुलातील ३५५ व्यापारी गाळ्यांचे बांधकाम व वाटप तत्कालीन पनवेल नगरपरिषदेमार्फत करण्यात आल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.

(२) व (३) पनवेल महानगरपालिकेने कळविल्यानुसार ६ व्यापारी संकुलातील ३५५ गाळे ३० वर्षे कालावधीसाठी जिल्हाधिकारी, रायगड यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने निश्चित केलेल्या भाडे दरानुसार तत्कालीन पनवेल नगरपरिषदेमार्फत वाटप करण्यात आले आहे.

तथापि, यापूर्वी ३० वर्षे कालावधीकरीता देण्यात आलेल्या तसेच करारनामे प्रलंबित असलेल्या गाळ्यांचे ताबा पावती/इरादा पत्र पावती दिनांकापासून पुढील ३० वर्षे कालावधीसाठी करारनामे करण्याबाबत पनवेल महानगरपालिकेच्या महासभेने दिनांक २७/०४/२०२२ रोजी निर्णय घेतला आहे.

सदर प्रकरणी उपरोक्त गाळ्यांचे अधिमुल्य व भाडेदर शासनाच्या स्थावर मालमत्ता हस्तांतरण नियम, १९८३ चे कलम ९ (२) अन्वये गठीत त्रिसदस्यीय समितीद्वारे निश्चित केलेल्या दरानुसार असून उपरोक्त भाडे आकारणी व वसूली करण्यात येत असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून जाणाऱ्या बुलेट ट्रेन प्रकल्पात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(७२) * १५१९८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र सरकारच्या महत्वाकांक्षी असलेला बुलेट ट्रेन प्रकल्प हा कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून जात असून बहुतांश भूमिपुत्रांच्या जमिनी बाधित झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ताडपत्रीची घरे असणाऱ्या बाधितांना रुपये १४ लाख मोबदला तर सातबारा असलेल्या भूमिपुत्रांना रुपये ७ लाखांचा मोबदला दिला जात असून ज्या शेतकऱ्यांकडून जमिनी संपादित केलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देताना गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त गैरव्यवहारासंदर्भात कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी, ठाणे यांची दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी भेट घेण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त भेटीदरम्यान कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी तक्रार देऊन यासंपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याबाबतची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने यासंपूर्ण गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकल्पाकरीता तालुक्यातील व कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील मौजे म्हातार्डी, आगासन, बेतवडे, शिळ, पडले व देसाई, ता.जि.ठाणे या ०६ गावांमधील तसेच कळवा मुंब्रा विधानसभा मतदार संघातील मौजे डावले असे एकूण ०७ गावामधील १८-०८-८१ हे.आर.चौ.मी. इतक्या खाजगी जमिनीचे संपादन करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाकरीता “भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ मधील तरतूदीनुसार खाजगी जमीन व त्यावरील बांधकाम यांचे मोबदला दिला जात आहे.

तसेच तसेच उक्त अधिनियमातील अनुसूची २ मधील तरतुदीन्वये खाजगी जमिनीचे निवाड्यांमधील पात्र शेतकरी कुटुंबांना पुनर्वसन व पुनर्स्थापनाचे पुढील लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे - (१) प्रत्येक बाधित कुटुंबास वर्षासनाचा पर्याय न्हणून रुपये ५,००,०००/- व एका वर्षाचा निर्वाह भत्ता रुपये ४३,२००/- असे एकूण रुपये ५,४३,२००/- (२) जमीन मालकाचे बांधकाम असल्यास, प्रती कुटुंब वाहतूक भत्ता रुपये ५०,०००/- व पुनर्वसन भत्ता रुपये ५०,०००/- असे एकूण रुपये १,००,०००/- (३) जमीनमालक व्यतिरीक्त इतर कुटंबाचे बांधकाम असल्यास, प्रती कुटुंब एका वर्षाचा निर्वाह भत्ता रुपये ४३,२००/-, वाहतूक भत्ता रुपये ५०,०००/- व पुनर्वसन भत्ता रुपये ५०,०००/- असे एकूण रुपये १,४३,२००/-.

सदर प्रकल्पासाठी उक्त अधिनियमातील अनुसूची १ नुसार प्रकल्प यंत्रणेने ENTITLEMENT MATRIX तयार करून, बाधित घरांचा मोबदला निश्चित करून दिलेला आहे तसेच डेडीकेटेड फ्रेटकॉरीडॉर कॉर्पोरेशन ऑफ़ इं.लि. या रेल्वे प्रकल्पाप्रमाणे शासकीय जमिनीवर अनधिकृत बांधकामात राहणाऱ्या पात्र कुटुंबांना कच्चे, पक्के व इतर असे सर्व प्रकारच्या बांधकामासाठी एकसमान कमीत कमी (न्यूनतम रक्कम) रोख अनुदान रक्कम १४,१७,०००/- रुपये प्रत्येक कुटुंबांसाठी निर्धारित केलेले आहे. त्याप्रमाणे शासकीय जमिनीवरील हमीपत्र दिलेले सर्व पात्र बाधित कुटुंबांना १४,१७,०००/- रुपये वाटप करण्यात आलेले आहे.

तसेच संपादित जमिनीची १०० % मोबदला रक्कम भूधारकांच्या बँक खात्यावर जमा होत असून जमिनीचा मोबदला देताना गैरव्यवहार झाल्याबाबत प्रकरण दिसून आलेले नाही.

(३), (४) व (५) कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी, ठाणे यांची दिनांक २२/१०/२०२२ रोजी भेट घेतली असून त्यावेळी त्यांचेसमवेत असलेल्या एका भूधारकाच्या खाजगी जमिनीवरील चाळीच्या संपादनाच्या मोबदल्याच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली होती. सद्य:स्थितीत सदर भूधारकास संपदनाचा देय मोबदला अदा करण्यात आलेला आहे. तसेच विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याबाबतची मागणी केलेली नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जामनेर (जि.जळगाव) नगरपालिकेच्या योजनांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(७३) * १६१६२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) नगरपालिकेमधील योजनांमध्ये शेकडो कोटींचा गैरव्यवहार झाल्याची तक्रार माजी नगराध्यक्ष, जामनेर यांनी दिनांक २६ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाकडून चौकशी समिती नेमण्यात आली होती, चौकशी समितीने कार्यवाही पूर्ण करुन अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जामनेर नगरपालिकेच्या योजनांमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशी तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हा परिषदेच्यावतीने अक्कलकोट तालुका पंचायत समितीमार्फत कृषि विभाग व जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून बोगस प्रकरणे मंजूर केल्याबाबत

**(७४) * १५७३० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा परिषदेच्या वतीने अक्कलकोट तालुका पंचायत समितीमार्फत कृषि विकास विभाग, जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाकडून विशेष घटक योजना, पंचायत समिती सेस आणि समाज कल्याण तसेच महिला कल्याण योजनेंतर्गत पंचायत समिती स्तरावर सन २०१२-१३ ते २०१५-१६ कालावधीतील बोगस प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहार प्रकरणी नेमण्यात आलेल्या चौकशी समितीमध्ये दोषी आढळून आलेल्यांवर नियमानुसार गुन्हे दाखल करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, पुणे यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक गुन्हे (पश्चिम), गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांना दोषींवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अक्कलकोट तालुका पंचायत समितीमार्फत बोगस प्रकरणे मंजूर केल्याप्रकरणी आढळून आलेल्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

जिल्हा परिषद स्तरावरुन विषय समित्यामध्ये लाभ मंजूर केलेल्या लाभार्थ्यांना लाभ न देता इतर व्यक्तींना पंचायत समिती स्तरावरुन लाभ देण्याची तक्रार प्राप्त झालेली आहे.

(२) हे खरे आहे.

प्रत्यक्षात गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदरचे प्रकरण गुन्हा अन्वेषण विभाग, पुणे यांचेकडे पाठविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी उपआयुक्त (विकास) पुणे विभाग सहाय्यक आयुक्त (विकास) पुणे, समाज कल्याण अधिकारी, पुणे व कृषी अधिकारी जिल्हा परिषद, पुणे यांच्या पथकामार्फत चौकशी करण्यात आली. समाज कल्याण विभाग व महिला बाल कल्याण विभाग सेस योजनेतंर्गत दोषी असणारे तत्कालीन कनिष्ठ सहाय्यक जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एन.एन. गायकवाड यांना निलंबित करण्यात येऊन, सहाय्यक आयुक्त (चौकशी) पुणे विभाग, पुणे यांच्यामार्फत विभागीय चौकशी करण्यात आली. श्री.गायकवाड हे दोषी आढळल्याने त्यांच्या तीन वेतनवाढी कायमस्वरुपी रोखण्यात आल्या आहेत. कृषी विभागाकडील गैरव्यवहार प्रकरणी दोषी कर्मचारी तत्कालीन कृषी अधिकारी श्री.एस.एम.माळी व कनिष्ठ सहाय्यक,जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एन.एन.गायकवाड यांना निलंबित करण्यात आले. तसेच, श्री.एस.एम. माळी,

श्री.एन.एन.गायकवाड व गटविकास अधिकारी श्री.व्ही.टी. साबळे या तीन अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द संयुक्तरित्या प्रादेशिक चौकशी अधिकारी तथा उपायुक्त (रोहयो) पुणे यांच्यामार्फत चौकशी सुरु आहे. तथापि, गटविकास अधिकारी श्री.व्ही.टी. साबळे यांचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये निधन झालेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील कचऱ्यांचे ब्लॅक स्पॉट दूर करुन भांडेवाडी येथील कचऱ्यावरील प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याबाबत

**(७५) * १६५४६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करणाऱ्या भांडेवाडीतील प्रकल्प गत काही महिन्यांपासून बंद असल्याने या ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत, सदर ठिकाणी कचऱ्यावरील प्रक्रियेला सुरुवात झाली असली तरी कचऱ्याचे ढीग कायम असल्याने परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर शहरात महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात एकूण १९८ कचऱ्यांचे ब्लॅक स्पॉट्स आढळून आले असून त्यापैकी सर्वाधिक ५३ ब्लॅक स्पॉट धरमपेठ येथील वसाहतीत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भांडेवाडीतील कचऱ्यावरील प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याबाबत तसेच नागपूर शहरात सार्वजनिक ठिकाणी इतरत्र कचरा टाकणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करुन कचराकुडी उभारण्याबाबत कोणीत कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे,

नागपूर शहरातील भांडेवाडी डंम्पिग यार्ड येथे दररोज प्राप्त ११०० ते १२०० मे. टन इतक्या घनकचऱ्यापैकी भांडेवाडी येथे महानगरपालिकेचा २०० TPD खतनिर्मिती प्रकल्प, साई बायो ऑरगॅनिक्स प्रा.लि. हैद्राबाद यांना दैनंदिन येणाऱ्या १५० ते २०० TPD ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्याकरीता दिनांक ०१ एप्रिल, २०२१ पासून प्रायोगिक तत्वावर देण्यात आलेला होता. सुमारे एक वर्ष काम करुन सद्य:स्थितीत कंत्राटदाराने काम बंद केलेले आहे.

तसेच, भांडेवाडी येथे सुका कचरा विलगीकरण केंद्र ३५० ते ४०० TPD अस्तित्वात असून दैनंदिन येणाऱ्या सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करुन त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याचे काम मे.मार्क इस्टेट ॲण्ड प्रोजेक्ट प्रा.लि. यांना प्रायोगिक तत्वावर दिनांक १७ मार्च,२०२२ रोजी देण्यात आले.

उर्वरित कचरा भांडेवाडी डंम्पिग यार्ड येथे लॅण्ड फिल साईटवर जमा करण्यात येतो. लॅण्ड फिल मधील जुन्या जमा कचऱ्यापैकी ६ लक्ष मे.टन कचऱ्याचे बायो माईनिंग करण्याचे काम प्रगतीपथावर असून कचऱ्याची दुर्गंधी येऊन आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना त्रास होणार नाही याकरीता नियमितपणे बायो कल्चर स्प्रे फवारणी, मातीचे आच्छादन यासारख्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

नागपूर महानगरपालिकेने केलेल्या सर्वेक्षणात आढळून आलेल्या एकूण १९८ कचऱ्याचे ब्लॅक स्पॉटपैकी सर्वाधिक ५४ ब्लॅक स्पॉट धरमपेठ येथे आढळून आले आहेत.

(३) भांडेवाडी येथे दैनंदिन येणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन विल्हेवाट लावण्याकरीता DFBOOT तत्वावर १५ वर्षांकरीता निम्नतम निविदाकार M/s susBDe holding B.V.(JV) यांना दिनांक ०६/१०/२०२२ रोजी letter of intent देण्यात आले असून त्यानुसार पुढील कार्यवाही नागपूर महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.

नागपूर शहरात इतरत्र कचरा टाकणाऱ्या १०,१९८ नागरिकांकडून रुपये ५०,९३,१००/- दंड वसूल करण्यात आला आहे व स्मार्ट बीन लावण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धरणगाव (जि.जळगाव) शहराला नियमित पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(७६) * १६६७४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरणगाव (जि.जळगाव) शहराला नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना विहिरीतील व गुरांसाठी राखीव असलेले दूषित पाणी प्यावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दूषित पाणी पिण्यामुळे शहरात नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धरणगाव शहराला नियमित स्वच्छ पाणीपुरवठा उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

धरणगांव शहराला होणारा पाणीपुरवठा हा जलशुध्दीकरणाची प्रक्रिया पूर्ण करुनच केला जातो. धरणगाव नगरपरिषदेतर्फे प्रत्येक महिन्याला पाणी नमुन्यांची जिल्हा आरोग्य शाळा यांच्याकडून तपासणी केली जाते. तसेच टँकरद्वारे पुरविले जाणाऱ्या पाण्यावर देखील ब्लिचींग पावडरची प्रक्रिया केली जाते.

(३) धरणगांव शहरात नियमित पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जल वितरण वाहिनी, तसेच दोन नवीन जलकुंभाचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रुग्णालये, उपनगरातील रुग्णालये व प्रसृतीगृहांच्या दैनंदिन आहारामध्ये दुधाचा समावेश करण्याबाबत

**(७७) * १६४६६ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नायर, के.ई.एम., सायन, कूपर या रुग्णालयात, उपनगरातील १६ रुग्णालयात व ३० प्रसुतीगृहात दिवसामध्ये दोन वेळा वितरित करण्यात येणारे दूध बंद करण्यात आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या आरे विभागामार्फत प्रति लिटर दुधाला रुपये ३९ इतका कमी दर महानगरपालिकेकडून आकारण्यात येत असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रुग्णालयांच्या आहारामधून दूध बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील रुग्णालये, उपनगरातील रुग्णालये व प्रसूतीगृहांना दैनंदिन आहारामध्ये दूध देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई दूध योजना, वरळी यांच्याकडून वाहतूक व पोहोच आकारासह रुपये ४१ प्रति लिटर या दराने बृहन्मुंबई महानगरपालिकेस दूध उपलब्ध होत होते. परंतु, महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई दूध योजना, वरळी यांनी दिनांक ०९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, दूध उपलब्ध नसल्यामुळे दुधाचा पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेस कळविले. तद्नंतर, मुंबई दूध योजना, वरळी यांच्याकडून दिनांक १२/११/२०२२ पासून दुधाचा पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांना व प्रसुतिगृहांना दुधाचा पुरवठा करणे अत्यंत आवश्यक होते. निविदा मागवून दुध पुरवठा करण्याकरीता जास्त कालावधी लागणार असल्यामुळे बृहन्मुंबई दूध योजना, वरळी यांनी दिनांक ०९/११/२०२२ रोजीच्या पत्रामध्ये शिफारस केल्याप्रमाणे महानंद दुग्धशाळा यांच्याकडून तात्पुरत्या स्वरुपात दूध घेण्याचे महानगरपालिकेमार्फत निश्चित करण्यात आले. तद्नंतर वाटाघाटीअंती महानंद दुग्धशाळा यांनी वाहतूक व पोहोच आकारासह रुपये ५१ प्रति लिटर या दराने दुध देण्याचे मान्य केले. सदर प्रस्तावास मान्यता मिळण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
तसेच, महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांना व प्रसुतिगृहांना दुधाचा पुरवठा करण्याकरीता निविदा तयार करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.
महानगरपालिकेमार्फत दिनांक १८/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, सर्व रुग्णालये आणि प्रसुतिगृहांना स्थानिक पातळीवर दुधाची खरेदी करण्याबाबत कळविण्यात आले असून त्यानुसार कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.